RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक - संजय मंगेश भैरे
वर्ष: ११ अंक :१३ ■ मुंबई, मंगळवार २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६
मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य - मुख्यमंत्री

पान २ वर

आता' गाव तिथे एसटी ' नव्हे ', आदिवासी पाडा, तिथे एसटी ' - परिवहन मंत्री

पान ३ वर

## ५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक लांबणीवर

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

राज्यातील ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. त्यामुळे राज्यातील २२ जिल्हा परिषदांसह त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणुका घेण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी राज्य सरकारने केली होती; मात्र न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास नकार दिला.



राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अहवालापूर्वीची स्थिती कायम ठेवून निवडणुका घेण्याचे आदेश यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. तथापि, राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण निश्चित करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे निदर्शनास आले. काही ठिकाणी निवडणुका पारही पडल्या आहेत. मात्र, २२ जिल्हा परिषद आणि संबंधित पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याने त्या ठिकाणच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पूर्ण केल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषद व संबंधित पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

राज्यात ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरील मनाई सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राज्य सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणुका घेण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती केली होती; मात्र न्यायालयाने ती मागणी फेटाळून लावली.

## सुधार समिती अध्यक्षपदी संध्या विपुल दोशी बिनविरोध

**मुंबई,**

महानगरपालिका सुधार समिती अध्यक्षपदी संध्या विपुल दोशी यांची आज बिनविरोध निवड करण्यात आली. पीठासीन अधिकारी महापौर रितू तावडे यांनी या बिनविरोध निवडीची घोषणा केली.



बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ पार पडल्यानंतर सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका विशेष सभेत सुधार समितीवर २६ महानगरपालिका सदस्यांची नामनिर्देशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे. या वैधानिक समितीच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्याकरिता आज सकाळी ११.०० वाजता विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सुधार समिती अध्यक्षपदासाठी श्रीमती संध्या विपुल दोशी यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासीन अधिकारी महापौर रितू तावडे यांनी जाहीर केले.

## त्रिशूली नदीत बस कोसळली; १८ जणांचा मृत्यू

**काठमांडू , वृत्तसंस्था**

नेपाळमधील धादिंग जिल्ह्यात सोमवारी पहाटे एक भीषण रस्ता अपघात झाला. पोखराहून काठमांडूकडे जाणारी एक प्रवासी बस हायवेवरून थेट त्रिशूली नदीत कोसळली. या दुर्घटनेत १८ प्रवाशांचा मृत्यू झाला असून २५ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे १:३० च्या सुमारास धादिंग जिल्ह्यातील बेनिघाट रोरांग ग्रामीण नगरपालिकेच्या भैसिंगौडा भागात ही दुर्घटना घडली. बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे बस संरक्षक कठडे तोडून नदीत कोसळली. अपघात झाला तेव्हा बसमध्ये एकूण ४४ प्रवासी होते. मृतांमध्ये १२ पुरुष आणि ६ महिलांचा समावेश आहे. मृतांमध्ये एका परदेशी पुरुष आणि एका महिलेचाही समावेश आहे, स्थानिक नागरिक आणि सशस्त्र पोलीस दलाने संयुक्तपणे बचाव मोहीम राबवून नदीत पडलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना तातडीने स्थानिक रुग्णालयात आणि त्यानंतर अधिक उपचारासाठी काठमांडू येथे हलवण्यात आले आहे.

# महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्तम मुख्यमंत्री

## अजितदादांच्या शोकपस्तावावर मुख्यमंत्र्याची भावना



**मुंबई, प्रतिनिधी**

**“अजित पवार हे सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री राहिलेले नेते होते. ‘कधीतरी मुख्यमंत्री होईन; पण कायम उपमुख्यमंत्री राहीन,’ असे ते कायम म्हणायचे. अजितदादा हे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते,” अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्याच्या विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज सुरुवात झाली. परंपरेनुसार अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोकप्रस्ताव मांडण्यात आला. या शोकप्रस्तावात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी भाजप आमदार राज पुरोहित यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. विधानसभेत शोकप्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.**

विधानसभेच्या कामकाजाची सुरुवात करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, “आज मनात वादळ आहे. अजित पवार यांच्या निधनावर शोकप्रस्ताव मांडावा लागेल, याची कल्पनाही करवत नाही. सभागृहात उजव्या बाजूला पाहिले की अजितदादा दिसायचे. कितीही उशिरापर्यंत कामकाज चालले तरी ते शेवटपर्यंत बसलेले असायचे.”

ते पुढे म्हणाले, “राजकारणात स्थिरावलेले आणि नेतृत्व सिद्ध केलेले अजित पवार यांचे जाणे म्हणजे एक मोठी पोकळी निर्माण होणे आहे. आता दुसरे ‘अजितदादा’ होणे शक्य नाही.” दशकाहून



अधिक काळाच्या मैत्रीचा उल्लेख करत त्यांनी अजित पवार यांच्या निधनाच्या एक दिवस आधी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीची आठवण सांगितली. “बैठकीनंतर पायाभूत सुविधांवर चर्चा झाली. त्यांच्या सिग्नेचर शैलीत त्यांनी अधिकाऱ्यांना प्रश्न विचारले. प्रत्येक मुद्दा त्यांनी कागदावर नोंदवून ठेवलेला असायचा. त्यानंतर आम्ही पाऊण तास गप्पा मारल्या; पण ती शेवटची भेट ठरेल, याची पुसटशीही कल्पना नव्हती,” असे ते म्हणाले. “एक दशकाहून अधिक काळ आमची मैत्री होती,” असेही त्यांनी नमूद केले.

‘लाडकी बहीण’ योजनेचे श्रेय अजित पवार यांना

“निवडणुकीपूर्वी ‘लाडकी बहीण’ योजना आणण्याचे ठरवले. मंत्रिमंडळात हा विषय चर्चेला आला तेव्हा काहींनी राज्याच्या तिजोरीवर ताण येईल, अशी चिंता व्यक्त केली होती. मात्र, अजित पवार यांनी काटेकोर आर्थिक नियोजन करून ही योजना प्रत्यक्षात आणली,” असे मुख्यमंत्री म्हणाले. विकास प्रकल्पांबाबत त्यांची दूरदृष्टी आणि निर्णयक्षमता अधोरेखित करताना त्यांनी सांगितले, “त्यांच्या टेबलावर फाईलींचा ढीग कधी दिसला नाही. ते अधिकाऱ्यांना थेट बोलावून घेत आणि तात्काळ योग्य निर्णय घेत. त्यांची ठाम पाठराखण करत.”

२०१९ मधील राजकीय घडामोडींचा संदर्भ देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, “आम्ही एकत्र येण्याचा निर्णय घेतला होता. वरिष्ठांनी नंतर भूमिका बदलली; पण अजितदादांनी ‘मी शब्द दिला आहे’ असे ठामपणे सांगितले. शपथविधीनंतर न्यायालयाचा निर्णय आमच्या विरोधात गेला. वर्षा बंगल्यावर बसून आम्ही तो निर्णय मागे घेण्याचे ठरवले.” त्या काळातील त्यांची भूमिका आणि धैर्य त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केले. “‘सकाळी ९ वाजता झालेला शपथविधी हा पहाटेचा नव्हता,’ असे अजित पवार कायम सांगायचे,” अशी आठवणही त्यांनी सांगितली.

अजित पवार यांचा वक्तशीरपणा हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता, असे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, “मंत्रालयात अधिकारी येण्यापूर्वीच अजितदादा पोहोचायचे. मंत्रालयाच्या कामकाजाची सुरुवातच त्यांच्या उपस्थितीने व्हायची.”

## अपघाताची चौकशी करा – भास्कर जाधव

अजित पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्र बारामतीकडे लोटला जात होता. मात्र, अजित पवारांसारख्या नेत्याचा अपघात होणे शक्य वाटत नाही; त्यामुळे मनात आजही संशय आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि सत्य महाराष्ट्रासमोर यावे, अशी मागणी शिवसेना (उबाठा) नेते भास्कर जाधव यांनी केली. ते पुढे म्हणाले, “रोहित पवार अजित पवार यांच्या अपघाताचा मुद्दा सातत्याने मांडत आहेत. काही जण शरद पवार आणि रोहित पवार यांच्या वक्तव्यांत विसंगती असल्याचे सांगत आहेत. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार यांचा एक व्हिडिओ समोर आला होता. त्या व्हिडिओमध्ये त्यांच्या हातात एक कागद होता. त्यांनी त्यातील एक ओळ वाचत ‘हा घातपात नसून अपघात आहे; याला कोणताही वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करू नये,’ असे स्पष्ट केले होते. त्या वेळी परिस्थिती अत्यंत नाजूक होती. जर ठिणगी पडली असती, तर गंभीर परिणाम झाले असते, याची जाणीव शरद पवारांना होती. म्हणूनच त्यांनी ते वक्तव्य केले. तरीदेखील या अपघाताची सखोल चौकशी झालीच पाहिजे,” असे भास्कर जाधव यांनी नमूद केले.

## निधनाच्या वृत्ताने मन सुन्न झाले – मुश्रीफ

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबर अतिशय जवळचे संबंध होते असे सांगत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. ‘अजित पवारांना दृष्ट लागली’, असे म्हणत मुश्रीफांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी भावूक झालेल्या मंत्री हसन मुश्रीफ यांचा कंठ दाटून आला व त्यांना अश्रू अनावर झाले. ‘अजित पवार सोडून गेले’, असे भावनिक उद्गार त्यांनी सभागृहात काढले. अजित पवार कामाच्याबाबतीत अतिशय वक्तशीर आणि कडक शिस्तीचे नेते होते असे हसन मुश्रीफ म्हणाले. सभागृहात हेडमास्तर प्रमाणे वागणाऱ्या अजित पवारांचा प्रशासन आणि अधिकाऱ्यांवर उत्तम वचक होता. साखर कारखानदारी आणि बँका याबाबत अजित पवारांची वेगळी मतं होती. याबाबत त्यांनी केंद्रात अमित शहा आणि नरेंद्र मोदींची भेट घेतल्याचेही मुश्रीफ यांनी सांगितले. ‘बारामतीसोबतच अजित पवारांचे कोल्हापूरवर देखील विशेष प्रेम होते’, असे मुश्रीफ यांनी सांगितले. अजित पवारांच्या अपघाताचे वृत्त फोनवरुन समजले त्यानंतर टीव्हीवर बातमी पाहिली आणि लगेच बारामती गाठली. दोन दिवस बारामतीत न झोपता थांबलो. ‘आमच्या नेत्याची अशी बातमी कधी कानावर येईल असे वाटले नाही’, असे सांगताना हसन मुश्रीफ यांना अश्रू अनावर झाले.

## कुणाची नजर लागली माहित नाही - जयंत पाटील

दादांसारखा नेता नियतीने हिरावून नेला. कुणाची नजर लागली काही माहित नाही. पण, महाराष्ट्राच्या राजकारणाला नजर लागली आणि दादांसारखा नेता आपल्यातून गेला. महाराष्ट्र राज्यात मोठ्या अपेक्षेने ज्यांच्याकडे बघितले जाते, त्यांनाच हिरावून घेण्याची नियतीची पद्धत आहे का, अशी शंका येत असल्याच्या भावना जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

## जगाचा निरोप घेण्याचा तुमचा निर्णय चुकला, परत या! - शिंदेंचा हुंदका फुटला

**मुंबई, प्रतिनिधी**

"राजकारणात तुम्ही घेतलेले निर्णय अचूक होते हे जनतेने सिद्ध केले, पण दादा, जगाचा निरोप घेण्याचा तुमचा हा निर्णय मात्र चुकला आहे. तो मागे घ्या आणि परत या..." अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. अजित पवार यांच्या निधनानंतर मांडण्यात आलेल्या शोकप्रस्तावावेळी एकनाथ शिंदे कमालीचे भावूक झाले होते, त्यांच्या शब्दाशब्दांतून जिवलग मित्र गमावल्याचे दुःख ओसंडून वाहत होते.

'ट्रँगल ऑफ स्टॅबिलिटी' कोसळला

महाराष्ट्राच्या राजकारणातील मजबूत त्रिकुटाचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, "मी, देवेंद्रजी आणि अजितदादा म्हणजे राज्याच्या स्थैर्याचा एक भक्कम 'ट्रँगल ऑफ स्टॅबिलिटी' होतो. आम्ही तिघे एकत्र होतो म्हणून महाराष्ट्राची प्रगती वेगाने सुरू होती. मात्र, २८ जानेवारीच्या त्या काळ्या दिवसाने आमचा हा आधारच हिरावून नेला. नियतीने केलेला तो घात पाहून आजही मनाचा थरकाप उडतो."

प्रशासनाचा 'स्कॅनर' आणि फणसासारखं व्यक्तिमत्व

अजितदादांच्या कार्यशैलीची आठवण सांगताना शिंदेंनी त्यांच्या प्रशासकीय शिस्तीचे कौतुक केले. "दादांची नजर फाईलवरून फिरली की काही सेकंदात चुका समोर यायच्या. साध्या लटकणाऱ्या वायरपासून ते चुकीच्या पायरीपर्यंत, ते कोणाचीही गय करायचे नाहीत. ११ वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम त्यांच्या नावावर होता. बाहेरून फणसासारखे कडक वाटणारे दादा आतून मात्र अत्यंत मृदू मनाचे होते. 'लाडकी बहीण' योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करताना त्यांनी राज्याच्या अर्थकारणाचा जो समतोल राखला, तो केवळ दादाच करू जाणे," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

मैत्रीचे किस्से आणि तो खंबीर पाठिंबा

शिंदे यांनी त्यांच्या मैत्रीतील एक गुपितही यावेळी उघड केले. हॉटेल हयात मधील एका महत्त्वपूर्ण बैठकीत जेव्हा मुख्यमंत्री बदलण्याची चर्चा होती, तेव्हा अजितदादांनीच "एकनाथराव असतील तर आम्हाला चालेल" असे ठामपणे सांगून माझ्यावर विश्वास दाखवला होता, अशी आठवण त्यांनी सांगितली. "दादा मला नेहमी रात्री उशिरापर्यंत काम न करण्याचा आणि तब्येतीची काळजी घेण्याचा वडिलकीचा सल्ला द्यायचे," असे म्हणताना शिंदेंचा कंठ दाटून आला.

## राजकारणातील मिश्कीलपणा हरपला- रोहित पवार

**मुंबई, प्रतिनिधी**

दिवंगत नेते अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावेळी त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार भावूक झाल्याचे दिसून आले. अजित पवार यांच्या आठवणी सांगताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू दाटले. “तुझ्या शर्टचे वरचे बटण नेहमी उघडे असते; ते लावत जा,” असे अजित पवार मला सांगायचे. मात्र, चाळीस–पन्नास वर्षांनंतर जेव्हा दादांची वर भेट होईल, तेव्हाच मी ते बटण लावेन. तोपर्यंत ते तसेच उघडे ठेवेन, जेणेकरून दादांची मला रोज आठवण येत राहील,” असे रोहित पवार म्हणाले. तसेच, अजितदादांच्या अपघातासाठी जो कोणी जबाबदार असेल, त्याला तुरुंगात पाठवल्याशिवाय सोडणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

‘अजितदादा पवार’ नावाचा जादूगार संपूर्ण महाराष्ट्राला हसवत-हसवत निघून गेला. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा हरपला,” असेही रोहित पवार म्हणाले. यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा घेत अनेक आठवणींना उजाळा दिला.

रोहित पवार म्हणाले, “एकदा अजितदादा मला म्हणाले होते, ‘रोहित, तुझे झिपऱ्या वाढल्या आहेत; त्या कमी कर.’ दादा गेले त्या दिवशी त्यांना आदरांजली म्हणून मी केस कापले. ते नेहमी म्हणायचे, ‘तुझे शारीरिक वजन वाढले आहे; ते कमी कर आणि राजकीय वजन वाढव.’ मी त्यावर फक्त ‘हो’ म्हणायचो. आज मी अजितदादांना शब्द देतो की माझी हेअरस्टाईल अशीच ठेवेन, शारीरिक वजन कमी करेन आणि राजकीय वजन वाढवेन.”

## दादा आमचा रुबाब आणि माज घेऊन गेले- आदिती तटकरे

आपल्या प्रत्येकाचा एक नेता असतो, त्या नेत्याच्या नेतृत्वात आपण काम करत असतो. तो नेता आपला अभिमान असतो, तो नेता आपला माज असतो, हा आमचा रुबाबदार नेता,चालत यायचे तेव्हा तो रुबाबदार पणा बघून आम्हाला अभिमान वाटायचा. आज नेता जात असताना, तो रुबाबदार नेता एकटा गेला नाही, कार्यकर्ता म्हणून आमचा रुबाबदारपणा आणि माजही निघून गेला, असे आदिती तटकरे म्हणाल्या. अजितदादांना जाऊन महिना होत आला, आम्हाला सर्वांना कुठेतरी वाटायचे ते आमच्यामध्ये असतील, असे वाटायचे पण तो भ्रम आज सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यावर तुटला, असेही आदिती तटकरे म्हणाल्या.

## दादांसारखा विश्वासू मित्र गमावला - उद्धव ठाकरे

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भावना व्यक्त करताना म्हटले की, माणसे असताना त्यांचे खरे महत्त्व कळत नाही. अनेकांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात दादांसोबत झाली. तर माझी आणि दादांची कारकीर्द मात्र विरोधी विचारांच्या वाटेनं चालत होती. एक सकाळ त्यांच्या एका निर्णयामुळे धक्का देणारी ठरली होती. तर दुसरी सकाळ त्यांच्या निधनाच्या बातमीने अंतःकरण हादरवून गेली. आम्ही अनपेक्षितपणे एकत्र सरकारमध्ये आलो. मला सरकार चालवण्याचा अनुभव नव्हता. मात्र, हळूहळू लक्षात आले की दादांसारखा विश्वासू मित्र माझ्यासोबत आहे. आज तो मित्र मी गमावला आहे. विषयांचा सखोल अभ्यास करणारा नेता विरळच असतो. मोठ्या वृक्षाच्या सावलीतून बाहेर पडत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. काहींना मात्र आयुष्यभर सावलीखालीच राहावे लागते".

अलीकडच्या काळात अजितदादाचं वक्तव्य होत ज्यांनी ७० हजार कोटींचे आरोप केले त्यांच्या सोबत आपण आहोत. कोणाला किती बदनाम करायचे याची मर्यादा आपण पाळली पाहिजे. एवढी बदनामी करणे योग्य नाही, दादा खचले नाहीत. एखादा माणूस चुकतो त्यावेळी खरेच तो चुकला आहे हे पाहणे गरजेचे आहे. त्यांनी कामातून प्रत्येक गोष्टीला उत्तर दिले. अजित दादांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ते कधी खचून नाही गेले. एखादा खचलेल्या मनाचा असता तर त्यांनी खरोखर जीव दिला असता, हे राजकारण किंवा ही संस्कृती आपल्या महाराष्ट्राची नाही अशा भावना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केल्या

# दिल्लीतील एआय आंतरराष्ट्रीय परिषदेचे भव्य आयोजन; पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत चर्चेचा सोन्याचा महिमा











**नवी दिल्ली**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील जागतिक चर्चेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून दिल्लीत आयोजित एआय आंतरराष्ट्रीय परिषदेने आज जगभरातील तज्ज्ञांना एकत्र आणले. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे आयटी व सांस्कृतिक मंत्री श्री आशिष शेलार, विकिपीडियाचे संस्थापक व अध्यक्ष अमेरिकेतील श्री जिमी वेल्स, हिंदुस्तान टाईम्सचे सीईओ श्री अविनाश मुडलीयार, सॉलिसिस लेक्सचे व्यवस्थापकीय भागीदार ॲड. अमित मेहता, दुबईतील एटिसलात आयटीचे जतिन मल्होत्रा, विकिपीडियासाठी काउन्सेल कबीर, एमआयटी bostonचे डीन आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. या परिषदेच्या माध्यमातून एआय तंत्रज्ञानाच्या भविष्यातील संधी आणि आव्हानांवर सखोल चर्चा झाली, ज्याने भारताला जागतिक एआय नेते म्हणून अधिक मजबूत स्थिती मिळवून दिली.

परिषदेचे उद्घाटन करताना पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी म्हणाले, "एआय ही केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी प्रगतीची एक क्रांती आहे. भारताने डिजिटल इंडियाच्या माध्यमातून एआय क्षेत्रात क्रांतिकारी पावले उचलली आहेत आणि ही परिषद त्याचा एक भाग आहे." त्यांच्या भाषणाने उपस्थित सर्वांना प्रेरणा मिळाली. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या भूमिकेवर भर देत म्हटले, "मुंबईसारख्या आर्थिक राजधानीतून सुरू झालेल्या एआय उपक्रम दिल्लीत येऊन एकत्र येत



आहेत. राज्य सरकार एआय स्टार्टअप्ससाठी ५०० कोटींची गुंतवणूक करणार आहे." मंत्री श्री आशिष शेलार यांनी सांस्कृतिक दृष्टिकोनातून एआय चा उपयोग कसा होऊ शकतो यावर प्रकाश टाकला आणि मराठी संस्कृतीतील डिजिटल संरक्षणासाठी विकिपीडियासारख्या व्यासपीठांची भूमिका अधोरेखित केली.

विकिपीडियाचे संस्थापक श्री जिमी वेल्स यांनी एआय च्या माध्यमातून ज्ञानाच्या प्रसारावर भर दिला. "विकिपीडिया ही ओपन सोर्स एआय ची सर्वोत्तम उदाहरण आहे. भारतासारख्या विविधतापूर्ण देशात एआय ने ज्ञानाच्या समान वितरणात मदत करेल," असे ते म्हणाले. हिंदुस्तान टाईम्सचे सीईओ श्री अविनाश मुडलीयार यांनी माध्यम क्षेत्रातील एआय च्या वापरावर चर्चा केली, तर ॲड. अमित मेहता यांनी कायदेशीर पैलूंवर प्रकाश टाकला. दुबईतील एटिसलातचे जतिन मल्होत्रा यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारातील एआय च्या भूमिकेवर सादरीकरण केले, ज्यात भारत-यूएई भागीदारीला प्राधान्य देण्यात आले. विकिपीडियासाठी काउन्सेल कबीर यांनी कॉपीराईट आणि एआय च्या नैतिकतेवर चर्चा केली, तर एमआयटी bostonचे डीन यांनी अभियांत्रिकी शिक्षणात एआय ची एकीकरणावर भर दिला.

या परिषदेत विविध सत्रांमध्ये एआय च्या आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवरील परिणामांवर चर्चा झाली. एका सत्रात भारतातील एआय स्टार्टअप्सना १०० कोटींच्या निधीची घोषणा करण्यात आली. परिषदेच्या प्रदर्शनात ५० हून अधिक कंपन्यांनी त्यांचे नवीन एआय सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर प्रदर्शित केले, ज्यात रोबोटिक्स आणि मशीन लर्निंगचे दृश्यात्मक सादरीकरण होते. उपस्थित मान्यवरांमधील संवादाने एआय च्या जागतिक मानकांसाठी भारताची जबाबदारी अधोरेखित झाली.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी आयोजक संस्थांनी विशेष प्रयत्न केले. दिल्लीतील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रात झालेल्या या कार्यक्रमाला २,००० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. भविष्यात अशा परिषदांची वार्षिक आयोजना करण्याची घोषणा करण्यात आली, ज्याने एआय क्षेत्रातील सहकार्य वाढेल. या परिषदेनंतर दिल्लीत एआय हब स्थापन करण्याच्या दिशेने पावले उचलली जातील, ज्यामुळे लाखो रोजगार निर्मिती होईल.

## राज्याला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा निर्धार

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२६ मधील पहिल्या अधिवेशनाची सुरुवात राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने दिमाखात झाली. आपल्या भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांचा उल्लेख करत राज्याला ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचा निर्धार व्यक्त केला.

राज्याच्या प्रगतीचा आढावा घेताना राज्यपाल म्हणाले की, २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राने १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित केली आहे. हे प्रमाण देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३९ टक्के असून, महाराष्ट्र गुंतवणुकीसाठी देशात प्रथम क्रमांकावर आहे. तसेच दावोस येथील परिषदेत झालेल्या ३० लाख कोटी रुपयांच्या करारांमधून सुमारे ४० लाख नवीन रोजगारनिर्मिती होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी कल्याणासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत राज्यपालांनी ‘मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना’चा उल्लेख केला. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज दिली जात आहे. तसेच सौर पंप बसविण्याच्या मोहिमेत महाराष्ट्राने ‘गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये स्थान मिळवले असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.

मराठी भाषेला ‘अभिजात’ दर्जा



मिळाल्यानंतर शासनाने उचललेल्या पावलांचेही त्यांनी कौतुक केले. तंत्रशिक्षणातील १५४ विषयांची पुस्तके आता मराठीत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ४२ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी मातृभाषेतून शिक्षण घेत असल्याचे सांगून त्यांनी ही राज्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले.

- समृद्धी महामार्ग : या महामार्गाचा विस्तार पालघर आणि पूर्व विदर्भापर्यंत करण्यात येणार.
- महिला सक्षमीकरण : २६ लाखांहून अधिक महिला ‘लखपती दीदी’ बनल्या आहेत.
- सांस्कृतिक वारसा : महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला आहे.
- कुंभमेळा : २०२७-२८ मधील नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे.

भाषणाच्या समारोपात राज्यपालांनी “विकसित महाराष्ट्र – २०४७” हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याचे आवाहन केले.

मराठी अक्रॉस मुंबई

# बेस्टला चार वर्षांनंतर मिळणार अध्यक्ष

**मुंबई, दि.२३ प्रतिनिधी**

बेस्ट उपक्रमाला तब्बल चार वर्षांनंतर अध्यक्ष मिळणार असल्यामुळे येत्या सोमवार २३ फेब्रुवारीपासून प्रशासकीय राजवट संपुष्टात येणार आहे. विशेष म्हणजे प्रशासकीय राजवटीमध्ये प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत बेस्ट कामगारांना आपल्या हक्काच्या अध्यक्षांकडे व्यथा मांडता येणार आहे.

बेस्ट उपक्रमामध्ये बेस्ट समिती अध्यक्ष हे प्रमुख पद आहे. बेस्ट समिती अध्यक्षाला प्रशासनातील प्रमुख असलेल्या महाव्यवस्थापकासह वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या दालनात बोलवण्याचा अधिकार असतो. त्यामुळे कामगारांचे अनेक प्रश्न अध्यक्षांच्या दालनात सुटतात. परंतु गेल्या चार वर्षांपासून बेस्टला अध्यक्ष नसल्यामुळे कामगारांच्या किरकोळ तक्रारींसह विविध प्रश्न प्रलंबित राहिले. महाव्यवस्थापक अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जाऊन कामगारांना थेट आपली तक्रार मांडता येत नाही. कामगार संघटनांच्या माध्यमातून प्रशासनाकडे जावे लागते. मात्र अध्यक्षांकडे प्रत्येक कामगार थापला हकाचा माणूस म्हणून आपली व्यथा मांडतो. बेस्टमध्ये शिस्तीला फार महत्त्व आहे. एखादा कर्मचारी गैरहजर राहिला अथवा अन्य काही कारणामुळे त्याला थेट निलंबित केले जाते. अशावेळी अध्यक्षामार्फत मध्यस्थी करून कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्यात येते. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी व अन्य देणी वेळेत मिळत नसल्यामुळे याबाबत अध्यक्षांकडे दाद मागण्यात येते. परंतु गेल्या चार वर्षांत अध्यक्ष नसल्यामुळे दाद मागायची तरी कोणाकडे, असा प्रश्न कर्मचाऱ्यांना पडला होता. मात्र सोमवारपासून कामगारांना आता आपल्या हक्काचा माणूस मिळणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

बेस्ट समितीच्या अध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या ज्येष्ठ नगरसेविका तृष्णा विश्वासराव यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सोमवारी निवडणूक होणार असून पहिल्यांदाच बेस्ट उपक्रमाचे स्टेअरिंग महिलेच्या हातात येणार आहे. त्यामुळे उपक्रमाला एक महिला अध्यक्ष म्हणून आर्थिक अडचणीतून कसे सोडवणार, याकडे बेस्ट कामगारांचे लक्ष लागले आहे.

# कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य - मुख्यमंत्री

**मुंबई, दि.२३ प्रतिनिधी**

शेतकऱ्याने डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर केला पाहिजे. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या विविध डिजिटल ॲपमुळे शेतकरी त्यांच्या भाषेत संवाद साधून शेती विषयक प्रश्नांचे उत्तर त्वरित मिळवू शकतात. महा-एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योग यांना एकत्र आणून एका डिजिटल सक्षम परिसंस्थेद्वारे शेतकऱ्यांचे जीवनमान सुकर करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.



'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण 2025-2029' धोरणांतर्गत येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन'(एआय फॉर ॲग्री २०२६) च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प संचालक परिमल सिंह, जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने डिजिटल पायाभूत सुविधा आणि एआयला राष्ट्रीय विकासासाठी महत्वाचे स्थान दिले आहे. इंडिया एआय मिशनचा उद्देश तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समावेशकता, पारदर्शकता आणि व्यापक परिणामकारकता आहे. शेती हे प्रत्येक घराशी व प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडित असलेले क्षेत्र आहे. कृषी क्षेत्राला पुढे नेण्याचा संकल्प करण्यात येत असून महाराष्ट्र राज्य एआय क्रांतीत आघाडीवर राहिल. सर्वसमावेशक एआय कृषी धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे.

शेतकऱ्यांसाठी महा-विस्तार एआय हा डिजिटल साथीदार विकसित करण्यात आला आहे. याच्या सहाय्याने शेती विषयक सल्ला, हवामान व कीड व्यवस्थापनाविषयी माहिती, बाजार भावाचे संकेत आदींसह शासकीय योजनांपर्यंत सुलभ प्रवेशही मिळणार आहे. आतापर्यंत ३० लाख शेतकऱ्यांपर्यंत हे ॲप पोहचले असून नोंदणीमध्ये वाढ होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र केवळ एआय वापरकर्ता न राहता, जबाबदार आणि परिणामकारक कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणारे अग्रगण्य राज्य बनेल. प्रत्येकाकडे स्मार्टफोन नाही, प्रत्येक शेतकरी ॲप वापरत नाही आणि प्रत्येकाला मराठीतच माहिती हवी असेही नाही. म्हणूनच शासनाने बहुभाषिक आणि व्हॉइस-आधारित डिजिटल सुविधा सुरू केल्या आहेत. यासाठी स्थानिक भाषांना प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे शेतकरी डिजिटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर करत आहेत. पुढील काळात ही सेवा प्रत्येक तालुका आणि गावापर्यंत विस्तारण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. शेतकऱ्यांसाठी महा एआय इनोव्हेशन सेंटरद्वारे विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग यांना एकत्र आणून एक सक्षम आणि उपयुक्त परिसंस्था (इकोसिस्टम) उभी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## महत्त्वाच्या बातम्या

### दिलीप वेंगसरकर यांचा "नवरत्न" पुरस्काराने गौरव



**मुंबई, प्रतिनिधी**

भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांना मुंबईतील सहारा सिटी हॉटेल येथे झालेल्या अग्रगण्य हिंदी दैनिक नवभारत टाइम्स च्या ७५ व्या वर्धापन दिन समारंभात "नवरत्न" पुरस्काराने गौरवान्वित करण्यात आले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वेंगसरकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वेंगसरकर यांच्यासह उद्योगपती हर्ष गोएंका, नादीर गोदरेज, गीतकार आणि शायर जावेद अख्तर, कवी आणि गीतकार प्रसून जोशी, सिने अभिनेता सनी देवल, ख्यातनाम वैज्ञानिक एम.एम. शर्मा, नॅशनल स्टॉक एक्सचेंज चे एम.डी. सी.ई.ओ. आशिष कुमार चौहान, टाटा मेमोरियल सेंटर चे डॉक्टर सुदीप गुप्ता अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना देखील या पुरस्काराने गौरविण्यात आले.

### बीडीडी चाळींचा पुनर्विकास गृहनिर्माण धोरणानुसार करा - अरविंद सावंत

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीच्या असलेल्या शिवडी बीडीडी चाळींचा पुनर्विकास महाराष्ट्र राज्य सरकारच्या गृहनिर्माण धोरणानुसार करण्यात यावा, शिवडी पूर्वेच्या पट्ट्यातील २००० च्या सर्व्हेनुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सर्व झोपड्यांचा त्याच जागी पुनर्विकास करा, अशी मागणी शिवसेना (ठाकरे गट) खासदार अरविंद सावंत यांनी मुंबई पोर्ट ट्रस्टकडे केली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टचे चेअरमन यांच्याबरोबर नुकतीच बैठक झाली. यावेळी निवेदन देण्यात आल्याचे उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे नगरसेवक सचिन पडवळ यांनी सांगितले. बैठकीला आमदार मनोज जामसुतकर, नगरसेवक सचिन पडवळ, रमाकांत रहाटे आदी उपस्थित होते.

### मेट्रो कारशेडचा मोबदला द्या, अन्यथा रस्त्यावर उतरू घोडबंदर-मोघरपाडा मेट्रो कारशेडबाधितांचा आक्रोश

**मुंबई, प्रतिनिधी**

वाहतूककोंडी कमी करण्यासाठी ठाणे शहरात मेट्रोचे जाळे झपाट्याने विस्तारत आहे. याच मेट्रो प्रकल्पासाठी ठाण्यातील मोघरपाडा परिसरात कारशेडसाठी सध्या जागा निश्चित करण्यात आली आहे. मात्र या प्रस्तावित कारशेडच्या जागेवर स्थानिक शेतकऱ्यांकडून भातशेती केली जात असून, संबंधित शेतकऱ्यांना अद्याप योग्य मोबदला प्रत्यक्षात मिळालेला नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. सरकारने मोबदल्याची प्रक्रिया केवळ कागदावर पूर्ण केल्याचा आरोप करत स्थानिक शेतकऱ्यांनी रविवारी शेतबांधावर ठिय्या आंदोलन केले. योग्य मोबदला मिळाला नाही, तर आम्ही शेती देणार नाही. आमचा रोजगार यावर अवलंबून आहे. वेळ पडल्यास आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा आंदोलक शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी जमिनीच्या बदल्यात स्थानिकांना १०० टक्के रोजगारात प्राधान्य द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### कोस्टल रोड ओपन स्पेससाठी आराखडा

**मुंबई, प्रतिनिधी**

. शहरातील कमी होत चाललेल्या वृक्षाच्छादन आणि वाढत्या प्रदूषणादरम्यान, कोस्टल रोड ओपन स्पेसला हिरवे करण्यासाठी पुन्हा एकदा चर्चा तीव्र झाली आहे. मुंबईच्या सतत कमी होत चाललेल्या हिरव्या आच्छादनाची भरपाई करण्यासाठी कोस्टल रोडवरील सुमारे ७० हेक्टर मोकळी जमीन हिरव्या आच्छादनाच्या एका लांब विस्तारात रूपांतरित होणार आहे, ज्यामध्ये विविध नागरी सुविधांचा समावेश आहे. रविवारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी साउथ मुंबई रेसिडेंट्स असोसिएशन (एसएमआरए) द्वारे आयोजित नागरिक संवादात कोस्टल रोड ओपन स्पेससाठी प्रस्तावित आराखडा सादर केला. शिवसेना खासदार मिलिंद देवरा देखील उपस्थित होते. १०.५८ किलोमीटर लांबीचा कोस्टल रोड मार्च २०२४ मध्ये जनतेसाठी खुला होणार होता. या क्षेत्रातील फक्त ४० हेक्टरमध्ये रस्ते, वाहतूक इंटरचेंज आणि पूल आहेत, तर उर्वरित ७० हेक्टर ओसाड जमीन आहे, जी उद्यान आणि खुल्या सार्वजनिक जागांसारख्या विविध नागरी सुविधांमध्ये विकसित केली जाणार आहे.

### दुप्पट रकमेचे आमिष दाखवत गुंतवणूकदारांची ३२ लाखांची फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

दुप्पट रकमेच्या आमिषाने गुंतवणूकदारांची सुमारे ३२ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी एका खासगी कंपनीच्या शामली सुनील घाडीगावकर, प्रवीण म्हात्रे ऊर्फ प्रवीण देसाई, महेश जाधव ऊर्फ महेश पाटील ऊर्फ अजय राठोड ऊर्फ अजय जाधव या तिघांविरुद्ध कस्तुरबा मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तिघेही मेसर्च ग्लोबल ॲक्टिव्ह कंपनीचे मालक आणि वरिष्ठ अधिकारी आहेत. यातील तक्रारदार टेम्पोचालक असून ते त्यांच्या कुटुंबीयांसोबत भायखळा परिसरात राहतात. सोशल मीडियावर त्यांना मेसर्च ग्लोबल ॲक्टिव्ह कंपनीची एक जाहिरात दिसली होती. ही कंपनीत शेअर ट्रेडिंग कंपनीत गुंतवणूक करत असून गुंतवणूकदाराचे पैसे शेअरमध्ये गुंतवणूक करुन त्यांना चांगला परतावा तसेच दुप्पट रक्कम देत असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यामुळे त्यांनी बोरिवलीतील दौलत नगर, गुरुकृपा हाऊसमध्ये असलेल्या कंपनीत जाऊन विविध योजनेची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. या योजनेत गुंतवणूक केल्यास त्यांना एक ते दोन वर्षांत दुप्पट रक्कम मिळेल, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी कंपनीत सहा लाखांची गुंतवणूक केली होती. या गुंतवणुकीवर त्यांना कंपनीने ८४ हजार रुपयांचे व्याजाची रक्कम दिली होती. जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या बँक खात्यात व्याजाची रक्कम आली नाही म्हणून त्यांनी चौकशी केली होती. यावेळी तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना विविध कारणे सांगून टाळण्याचा प्रयत्न केला होता. काही दिवसांनी ते कंपनीच्या कार्यालयात गेले होते. यावेळी त्यांना टाळे लावल्याचे आढळले.

### मित्रानेच मित्राच्या रूममध्ये जिवंत काडतुसे ठेवल्याने खळबळ

**मुंबई, प्रतिनिधी**

आर्थिक वादातून मित्रानेच मित्राच्या रूममध्ये पाच जिवंत काडतुसे ठेवल्याची घटना पवईतील आयआयटीमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी आरोपी मित्राविरुद्ध पोलिसांनी जिवंत काडतुसे बाळगल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून त्याला पवई पोलिसांनी अटक केली आहे. अटकेनंतर त्याला रविवारी दुपारी वांद्रे येथील स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले होते. यातील तक्रारदार पवईतील आयआयटीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. शुक्रवारी दुपारी वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावर काही विद्यार्थ्यांमध्ये वाद सुरू असल्याची माहिती सुरक्षारक्षकांना मिळाली होती. त्यामुळे तक्रारदारासह इतर सुरक्षारक्षक तिथे गेले होते. यावेळी खोली क्रमांक ९३ मधील मोकळ्या जागेत दोन विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक वादातून भांडण सुरु असल्याचे दिसून आले. त्यांनी मद्यप्राशन केल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी त्यांच्या रूमची पाहणी केली होती. या तपासणीत एका विद्यार्थ्याच्या रूममध्ये पाच जिवंत काडतुसे सापडली. ती काडतुसे एका बॅगेत ठेवण्यात आली होती. हा प्रकार लक्षात येताच तक्रारदारांनी पवई पोलिसांना ही माहिती दिली. या माहितीनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. चौकशीनंतर आरोपीने त्याच्या मित्राच्या रूममध्ये ती जिवंत काडतुसे ठेवल्याचे उघडकीस आले होते.

# सिंधुदुर्गचा स्वच्छतेत देशात अव्वल क्रमांक: पंतप्रधान मोदींच्या हस्ते ३० ऑक्टोबरला गौरव

**सिंधुदुर्ग, प्रतिनिधी**

देशभरातील स्वच्छता सर्वेक्षणात महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशोगाथेचा सन्मान करण्यासाठी ३० ऑक्टोबरला दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सिंधुदुर्गाला विशेष गौरव प्रदान केला जाणार आहे. या जिल्ह्याने केवळ स्वच्छतेतच नव्हे, तर अनेक सामाजिक, पर्यावरणीय आणि शैक्षणिक क्षेत्रात देशासमोर आदर्श उदाहरण उभे केले आहे.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षणात सिंधुदुर्गाने सर्वाधिक गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले. जिल्ह्यातील प्रत्येक गावाने स्वच्छतेची जबाबदारी समर्थपणे सांभाळली असून, यामुळे सिंधुदुर्ग स्वच्छतेच्या मानचित्रावर चमकला आहे. जिल्हा प्रशासनाने हागणदारी मुक्ती योजनेचे प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक घराला स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**कोकणातील 'स्वर्ग': सिंधुदुर्गाचे वैशिष्ट्य**

"आपले कोकण अनेक विषयांत देशात आणि जगात प्रथम आहे," असे म्हणत सिंधुदुर्गवासी अभिमानाने डोके उंचावतात. येथील माणसांची साधी जीवनपद्धती, निसर्ग आणि मानवी जीवनाचा समतोल, नैसर्गिक पर्यावरणप्रेम हे सर्व काही या यशाचे रहस्य आहे. सिंधुदुर्गाने अनेक क्षेत्रांत शून्य टार्गेट साध्य केले आहे:

शून्य हुंडाबळी: हुंड्याच्या नावाखाली होणाऱ्या क्रूर घटना पूर्णपणे उन्मूलन.

शून्य भिकारी: जिल्ह्यात भिकारींची संख्या शून्य.

शून्य स्त्रीभ्रूणहत्या: मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणारी धोरणे यशस्वी.

शून्य कर्जबाजारीपणा: शेतकरी आणि नागरिकांना कर्जमुक्तीची हमी.

शून्य शेतकरी आत्महत्या: शेतीसंबंधीच्या समस्या सोडवून आत्महत्या रोखल्या.

शून्य सरकारी निधी व कर्ज डुबवणे: निधीचा पारदर्शक वापर आणि कर्जवसुलीतील यश.

शैक्षणिक क्षेत्रातही सिंधुदुर्गाने गेल्या पाच वर्षांत सतत एसएससी आणि एचएससी बोर्ड परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर झाला आहे.

**आदर्श गावांचा ठसा**

जिल्ह्यातील अनेक गावांनी पर्यावरण, पर्यटन आणि परंपरा या क्षेत्रांत विशेष योगदान दिले आहे. मालवणमधील हडी गाव, कुडाळमधील निवजे, वेंगुर्ल्यातील भोगवे आणि दोडामार्गमधील आयी ही गावे पर्यटन आणि पर्यावरण संरक्षणात अग्रेसर आहेत. या गावांनी परंपरागत जीवनशैली जपत पर्यटनाला चालना दिली असून, पर्यावरणपूरक उपक्रम राबविले आहेत. हागणदारी मुक्ती योजनेचे यशस्वी अंमलबजावणीमुळे या गावांत स्वच्छतेचा आदर्श निर्माण झाला आहे.

**सिंधुदुर्गवास्यांचा अभिमान**

सिंधुदुर्गातील गावकऱ्यांनी आपल्या जीवनशैलीतून देशाला स्वच्छतेचा धागा दिला आहे. "आम्ही गावात राहतो, पण देशाला स्वच्छतेचा आदर्श देतो," असे म्हणत स्थानिक नागरिक अभिमान व्यक्त करतात. या यशामुळे सिंधुदुर्गवासी केवळ जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण देशात गौरवान्वित झाले आहेत.

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणारा हा गौरव सिंधुदुर्गाच्या मेहनतीचे प्रत्यक्ष पुरस्कार आहे. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, हे यश सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागामुळे शक्य झाले आहे. भविष्यातही सिंधुदुर्ग स्वच्छता आणि विकासाच्या क्षेत्रात अग्रेसर राहील, अशी अपेक्षा आहे.

# महिम मराठी नगर पुनर्विकास प्रकल्पासाठी कायदेशीर सल्लागार मंडळाची निवड; संस्थेच्या हितसंबंधांचे रक्षण प्राधान्य

**मुंबई, प्रतिनिधी**

महिम मराठी नगरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या महासंघाने (मयादित) पुनर्विकास प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर कायदेशीर सल्लागार मंडळाची निवड करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० हून अधिक संस्थांच्या हजारो सदस्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण होण्याची शक्यता आहे. महासंघाने जारी केलेल्या अधिकृत पत्रानुसार, 'सोल्सिस लेक्स लॉ फर्म्स'च्या वकील अमित मेहता यांना या प्रकल्पासाठी कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आली आहे. हे पत्र महासंघाचे अध्यक्ष महेश तरे यांनी दत्ता गडेकर (सचिव) आणि रवींद्र पाटील (खजिनदार) यांच्या सह्या घेऊन जारी केले आहे.

माहिम मराठी नगर हे मुंबईतील ई वॉर्डातील एक प्रमुख मराठी वस्ती आहे, जेथे श्रीराम मंदिराजवळील जनरल ए. के. वैद्य मार्गावर अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या भागातील इमारतींचे सरासरी वय ४० वर्षांपेक्षा जास्त असल्याने, पुनर्विकासाची गरज गेल्या काही वर्षांपासून अधोरेखित होत आहे. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या विशेष बैठकीत (दिनांक१९/०२/२०२६) या विषयावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत उपस्थित सदस्यांनी एकमताने कायदेशीर सल्लागार मंडळाची स्थापना करण्यास मंजुरी दिली. या मंडळाचा मुख्य उद्देश पुनर्विकास प्रक्रियेदरम्यान संस्था आणि सदस्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे, करारपत्रांची तपासणी करणे आणि बिल्डरसोबतच्या वाटाघाटींमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करणे असा आहे.

महासंघाचे अध्यक्ष नीलेश तरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, "पुनर्विकास प्रकल्प हा आमच्यासाठी एक संधी आहे, परंतु यात अनेक कायदेशीर जटिलता आहेत. ई वॉर्डातील (२)(१०) या प्रकल्पासाठी आम्ही आता कायदेशीर सल्लागार मंडळाची निवड करत आहोत. हे मंडळ संस्थेच्या हितसंबंधांचे रक्षण करेल आणि सदस्यांना योग्य फायदा मिळवून देईल." पत्रात पुढे सांगितले आहे की, कायदेशीर सल्लागार अमित मेहता यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० अंतर्गत पुनर्विकासाशी संबंधित अनेक यशस्वी प्रकरणांचा अनुभव आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे प्रकल्पाची प्रक्रिया वेगवान आणि सुरक्षित होईल.

या निर्णयाची पार्श्वभूमी पाहता, मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये पुनर्विकासाच्या नावाखाली होणाऱ्या अनियमिततांमुळे गेल्या काही वर्षांत अनेक वाद उद्भवले आहेत. माहिम मराठी नगरातील संस्था मात्र एकत्र येऊन हे पाऊल उचलत आहेत, जे इतर भागांसाठी आदर्श ठरू शकते. महासंघाने पत्रात स्पष्ट केले आहे की, या मंडळाची निवड पारदर्शक पद्धतीने झाली असून, यात संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता. सदस्यांच्या हितासाठी कायदेशीर सल्लागाराकडून नियमित अहवाल सादर केले जातील आणि महत्त्वाच्या निर्णयांपूर्वी सर्व सदस्यांना माहिती दिली जाईल.

या प्रकल्पामुळे माहिम भागातील रहिवाशांना आधुनिक सुविधा असलेल्या नवीन इमारती मिळण्याची आशा आहे. यात पार्किंग, लिफ्ट, जिम, सामुदायिक हॉल यांसारख्या सुविधांचा समावेश असेल. तसेच, पुनर्विकासादरम्यान रहिवाशांना तात्पुरती निवास व्यवस्था आणि भाडे भरपाईची तरतूदही केली जाईल. महासंघाचे खजिनदार रवींद्र पाटील यांनी सांगितले, "आमचा हेतू फक्त पुनर्विकास नाही, तर सदस्यांच्या दीर्घकालीन हितांचे संरक्षण आहे. कायदेशीर सल्लागारांच्या मदतीने आम्ही कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीपासून दूर राहू."

मुंबई महानगरपालिकेच्या ई वॉर्ड कार्यालयाकडून या प्रकल्पाला प्राथमिक मंजुरी मिळाली असून, लवकरच बिल्डर निवडीची प्रक्रिया सुरू होईल. या निर्णयामुळे माहिम मराठी नगरातील मराठी समाजातील रहिवाशांमध्ये उत्साह आहे. संस्थेच्या या पुढाकारामुळे इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठीही मार्गदर्शक ठरेल. एकूणच, हा निर्णय मुंबईतील पुनर्विकास क्षेत्रात एक सकारात्मक पाऊल म्हणून पाहिला जात आहे.

# समृद्धी महामार्गाचा आता चंद्रपूरपर्यंत विस्तार

**मुंबई, प्रतिनिधी**



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या समृद्धी महामार्गासंदर्भात एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. समृद्धी महामार्ग आता वाघांचा गड आणि कोळशाची राजधानी असलेल्या चंद्रपूरपर्यंत विस्तारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी निधी मंजूर करून सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या इतिहासात एक नवीन अध्याय जोडला जाणार आहे.

राज्य सरकारने नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्गाच्या बांधकामाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. प्रकल्पासाठी भूसंपादनासाठी सरकारने ₹२,३५३ कोटींचे कर्ज उभारण्यास मान्यता दिली आहे. एकूण रकमेपैकी ₹१,४७० कोटी ही मूळ रक्कम असेल, तर ₹८६० कोटी व्याज असेल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे कर्ज हुडकोकडून घेईल. हुडकोने यापूर्वी रस्ते प्रकल्पांसाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा केला आहे.

हा मार्ग समृद्धी महामार्गाच्या सेलडोह इंटरचेंजपासून सुरू होईल आणि दुर्ग-हैदराबाद महामार्गावरील (१९२ किमी) नवेगाव (मोर) पर्यंत जाईल, ज्यामध्ये आणखी ११ किमीचा रस्ता थेट चंद्रपूरला जोडेल. संपूर्ण मार्गासाठी अंदाजे २००० हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याचा अंदाज आहे. सरकारी ठरावानुसार (जीआर) कर्जाचे हप्ते टोल वसुलीच्या माध्यमातून दिले जातील. महसुलात काही कमतरता असल्यास, महाराष्ट्र सरकार हुडको कर्जाची वेळेवर परतफेड करण्यासाठी राज्याच्या तिजोरीतून ती कमतरता भरून काढेल.

समृद्धी महामार्गाचा नागपूर – चंद्रपूर, नागपूर – गोंदिया आणि भंडारा – गडचिरोली या मार्गांने विस्तार करण्यात येणार आहे. या तीनही महामार्गांच्या बांधकामासाठी एमएसआरडीसी ने निविदा प्रक्रिया राबवली होती. पण भूसंपादनाच्या प्रक्रिया पूर्ण होण्यास वेळ लागणार असल्याने ती निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली होता. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतरही नव्याने निविदा प्रक्रिया काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

सुरूवातीला नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्गाला पर्यावरणासंबंधी परवानगी देण्यात आली होती. पण या प्रकल्पात काही प्रमाणात वनक्षेत्राचे नुकसान होणार होते. यात काही घट करता येईल का, यासंदर्भात सुधारित आराखडा तयार करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले. त्यानुसारस एमएसआरडीसीने आराखड्यात बदल करून यासंबंधीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला. या प्रस्तावात मान्यता देऊन शुक्रवारी पुन्हा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.

# वैद्यकीय शिक्षणाच्या नियमांत होणार बदल

**मुंबई, प्रतिनिधी**

देशात नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे, नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे आणि विद्यमान महाविद्यालयांची प्रवेशक्षमता प्रक्रियेत आता मोठे बदल होण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) संबंधित नियमांमध्ये दुरुस्तीचा मसुदा जाहीर केला असून, अर्जदारांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, आर्थिक क्षमता आणि नियमभंगावरील कारवाई या सर्व बाबींमध्ये स्पष्ट तरतुदी सुचविण्यात आल्या आहेत.

देशभरात वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडवून आणण्याच्या दिशेने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) ने नियमांत व्यापक दुरुस्तीचा मसुदा आयोगाने जाहीर केला आहे. या प्रस्तावित बदलांवर नागरिक, संस्था आणि संबंधित घटकांकडून ३० दिवसांच्या आत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. आयोगाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार नियमांतील कलम ६, ९, १५ आणि ३१ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. कलम ६ (अ) रद्द करण्याचा प्रस्ताव असून, कलम ६ (ग) मध्ये बदल करून कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत कंपनीलाच वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास पात्रता देण्यात येणार आहे.

याशिवाय, संबंधित राज्यातील प्रचलित कायद्याअंतर्गत नोंदणीकृत ट्रस्टलाही अर्ज करण्याची परवानगी देण्यासाठी नवीन कलम ६ (ह) समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे अर्जदारांच्या पात्रता संदर्भात अधिक स्पष्टता येणार आहे.

# मुंबईतील ७ लाख विद्यार्थी समूहगीत गायन करून रचणार विक्रम

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग तसेच राज्यस्तरीय समागम समितीद्वारा 'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० वा शहीदी समागमचे २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी नवी मुंबई येथे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्ताने श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या जीवनप्रवासावर आधारित गीताचे मुंबईतील ७ लाख १४ हजार ६२६ विद्यार्थी २३ फेब्रुवारी रोजी समूह गायन करणार आहेत. यापैकी सकाळच्या सत्रातील विद्यार्थी सकाळी ९ वाजता तर दुपारच्या सत्रातील विद्यार्थी दुपारी १ वाजता शाळेच्या परिपाठावेळी गायन करतील. बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महानगरपालिका प्राथमिक, माध्यमिक, खासगी अनुदानित, विना अनुदानित व अन्य मंडळांच्या एकूण २ हजार ३२१ शाळांमधील विद्यार्थ्यांसह राज्यभरातील सुमारे ५१ लाख विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स कडून या विक्रमासाठी नोंद घेण्यात येत आहे.

# आता दशकभराचा मान्सून अंदाज शक्य

**मुंबई, प्रतिनिधी**



भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (इंडियन इन्स्टट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी आयआयटीएम) यांनी विकसित केलेल्या दशकभराच्या नव्या हवामान अंदाज प्रणालीवरील संशोधन अहवाल प्रसिद्ध झाला आहे. 'आयआयटीएम दशक हवामान अंदाज प्रणाली' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अभ्यासात भारतीय उन्हाळी मान्सूनमधील वर्षानुवर्षे आणि दशकानुसार होणारे बदल, जागतिक हवामान घटकांशी त्याचे संबंध आणि प्रणालीची अचूकता यांचे सविस्तर मूल्यमापन करण्यात आले आहे. पावसाचे वितरण, तापमानातील त्रुटी तसेच विविध जागतिक हवामान चक्रांचा मान्सूनवरील परिणाम अधिक नेमकेपणाने दर्शविण्यात ही प्रणाली यशस्वी ठरल्याचे अहवालात नमूद आहे. हा अहवाल पी. व्ही. राजेश, रोसिमिथा पांडा, सी.

ज्ञानसीलन, राहुल पाई, रश्मी काकतकर, दर्शना पाटेकर, जे. एस. दीपा, ए. जी. प्रजीश, अमित कुमार शर्मा, टी. एस. फौसिया, सुब्रतो हलदर, अनिला सेबॅस्टियन, अनंत पारेख आणि सैकत प्रमाणिक यांनी तयार केला आहे. ही नवी प्रणाली पूर्वीच्या पृथ्वी प्रणाली नमुन्यावर आधारित असून, एक ते दहा वर्षांच्या कालावधीसाठी अधिक विश्वासार्ह हवामान अंदाज देण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील दशकभराच्या हवामान अंदाज उपक्रमातही या प्रणालीचे योगदान राहणार आहे.

# बेपत्ता मुलांना शोधण्यात पोलिसांना ९९ टक्के यश

**मुंबई, प्रतिनिधी**

एका बाजूला मुले पळवणाऱ्या टोळ्या सक्रिय असल्याच्या अफवा, अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याच्या घटना वाढल्या असतानाच; दुसरीकडे मुंबई पोलिसांनी मात्र या घटनांची गंभीर दखल घेतली आहे. २०२५मध्ये हरवलेल्या, अपहरण झालेल्या जवळपास ९९ टक्के अल्पवयीन मुलांना, मुलींना शोधून काढण्यात मुंबई पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी २,१८२ मुलांपैकी २,१६५ मुलांना शोधून काढले आहे.

राज्यातील इतर शहरांप्रमाणेच मुंबईतही लहान मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक आहे. लहान मुलांप्रमाणेच १५ ते १७ वर्षे वयोगटातील अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्यास अपहरणाचा गुन्हा दाखल केला जातो. अपहरणाच्या गुन्ह्याचा

तपास करण्यास प्राधान्य दिले जाते. तपास सुलभ पद्धतीने करता यावा यासाठी ०-५ वर्षे, ५-१० वर्षे, १०-१४ वर्षे, १४-१६ वर्षे आणि १६-१८ वर्षे अशा पाच वयोगटात वर्गीकरण केले आहे. यानुसार पोलिसांची पथके तयार करून त्यांच्याकडे वेगवेगळी जबाबदारी देण्यात आली. वेगवेगळ्या पोलिसांसह बेपत्ता व्यक्तींच्या पोर्टलची देखील मदत घेण्यात आली. परिणामी पोलिसांना यामध्ये ९९ टक्के यश आले. २०२५ मध्ये शहरातील बेपत्ता अल्पवयीन मुलांच्या २,१८२ प्रकरणांपैकी २,१६५ प्रकरणे पोलिसांनी तडीस लावली. शोधण्यात आलेल्या अल्पवयीन मुलांमध्ये चौथ्या आणि पाचव्या गटातील अल्पवयीन मुली अधिक असून बहुतांश मुलींना लग्नाची फूस लावून पळवून नेण्यात आले होते.

# आता ' गाव तिथे एसटी ' नव्हे ', आदिवासी पाडा, तिथे एसटी '- परिवहन मंत्री

**मुंबई, प्रतिनिधी**

सह्याद्री व मेळघाटच्या कुशीत, धुक्याने वेढलेल्या डोंगरदऱ्यांमध्ये, आजवर केवळ पायवाटांनीच ओलांडलेले अंतर आता 'लालपरी' च्या चाकांनी मोजले जाणार आहे! राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची सेवा पोहोचवण्याचा ऐतिहासिक संकल्प परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला.

"आता केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आदिवासी पाडा तिथे एसटी," असा ठाम निर्धार करत त्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरू केल्याची घोषणा केली.

**' पुण्यश्लोक अहिल्यादेवी ' मिडी बसेस – विकासाची नवी वाट**

राज्य परिवहन महामंडळ ९ मीटर लांबीच्या, ३५ आसनी अशा १०० अत्याधुनिक मिडी बसेस खरेदी करीत असून या बसेसना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' असे प्रेरणादायी नामकरण करण्यात येणार आहे. अरुंद रस्ते, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाच्या घाटरस्त्यांवरून सहज धावू शकतील, अशा या बसेस खास करून आदिवासी पाड्यांसाठीच नियोजित आहेत.स्वातंत्र्यानंतरच्या आठ दशकांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एसटी पोहोचली. आज तब्बल ९३% लोकसंख्या एसटी सेवेशी जोडलेली आहे. तरीही सह्याद्री व मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यातील अनेक पाडे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच राहिले होते. मोठ्या बसेसना तिथे प्रवेश शक्य नव्हता; त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी आदिवासी बांधवांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. आता मात्र ही पायपीट थांबणार आहे.

ही केवळ बससेवा नाही, तर सामाजिक समावेशकतेचा सेतू आहे. शिक्षणासाठी शहरात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, आरोग्यसेवेसाठी धाव घेणाऱ्या मातांसाठी आणि रोजगाराच्या शोधात निघालेल्या तरुणांसाठी ही ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी ' बस म्हणजे आशेचा किरण ठरणार आहे.

मंत्री सरनाईक यांनी आशावाद व्यक्त करत सांगितले की, "दुर्गम भागातील आपला आदिवासी समाज आता एसटीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राशी जोडला जाईल. विकासाची गंगा प्रत्येक पाड्यापर्यंत पोहोचवण्याचा हा आमचा निर्धार आहे.

# जागतिक स्तरावर भारताची बदनामी करण्याचे काँग्रेसचे सुनियोजित षड्यंत्र - नवनाथ बन

**मुंबई, प्रतिनिधी**

. दिल्लीतील 'एआय समिट'मधील युवक काँग्रेसचे आंदोलन म्हणजे आंतराष्ट्रीय स्तरावर भारताची बदनामी करण्याचे सुनियोजित षडयंत्र आहे असे टिकास्त्र भाजपचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी सोडले. युवक काँग्रेसचे एआय समिट मधील कपडे काढण्याचे आंदोलन लाजिरवाणे होते. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगभरात भारताची मान अभिमानाने उंचावली जात आहे. देशाची प्रगती आणि वाढती ताकद यामुळे अस्वस्थ असलेल्या काँग्रेस ने लांछनास्पद कृत्य केल्याचेही बन यांनी नमूद केले.

काँग्रेसच्या या देशविरोधी कृत्याचा निषेध करण्यासाठी काल भाजयुमो कार्यकर्त्यांनी आंदोलन केले आणि आजही राहुल गांधी भिवंडी कोर्टात जात असताना भाजयुमो कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले. देश विरोधी अजेंडा राबवणा-या काँग्रेसला आगामी काळात जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा ही त्यांनी दिला.

**युवा पिढी पंतप्रधान मोदींच्या पाठीशी**

मतदारांनी काँग्रेसला वारंवार नाकारल्यामुळे आलेल्या अस्वस्थतेतून राहुल गांधी देशात अस्वस्थता, अराजक माजवण्याचा सातत्याने प्रयत्न करतात. आधीही भारतातील युवा पिढी (जेन झी) नेपाळसारखे अराजक भारतात माजवेल असे लाजिरवाणे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते याची आठवण करून देत आत्ताच्या युवक काँग्रेसच्या आंदोलनावरून राहुल यांना बन यांनी खडे बोल सुनावले. भारतातील युवा पिढी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पाठीशी आहे, काँग्रेसने कितीही प्रयत्न केले तरी काहीही फरक पडणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

**जामीनावर बाहेर असलेले नेते देशाचे नेतृत्व करू शकत नाहीत**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि महात्मा गांधी हत्या यांचा सूतराम संबंध नसताना राहुल गांधी संघावर बिनबुडाचे आरोप करतात. याबद्दल सुप्रीम कोर्टाने स्पष्टता दिली आहे, तत्कालीन काँग्रेस सरकारने स्पष्टता दिली असताना देखील राहुल बरळत आहेत अशी टीका बन यांनी केली. संघाची आणि देशाची बदनामी करणे हा काँग्रेसचा आवडता उद्योग झाला आहे. जामीनावर बाहेर असलेले नेते देशाचे नेतृत्व करू शकत नाहीत असा टोला त्यांनी जामीनावर बाहेर असलेल्या राहुल, सोनिया, हर्षवर्धन सपकाळ यांना मारला.

**संजय राऊतांना रोज नाक घासून माफी मागायला लागेल**

दादा भुसे यांच्यावर कथित घोटाळ्याचे बिनबुडाचे आरोप केल्याप्रकरणी राऊतांवर मालेगाव कोर्टात अब्रुनुकसानीचा खटला सुरू आहे. त्या प्रकरणात राऊतांना मालेगाव कोर्टात जाऊन नाक घासायला लागणार आहे . पुराव्याविना खोटे आरोप केल्यावरून अशा पद्धतीने राऊतांना मालेगाव कोर्टातच नाही तर रोज नाक घासून माफी मागायला लागणार आहे अशी खिल्ली त्यांनी उडवली.

# राजावाडी रुग्णालयाची महापौरांनी केली पाहणी

**मुंबई, प्रतिनिधी**

घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयाची मुंबईच्या महापौर श्रीमती रितू राजेश तावडे यांनी पाहणी करून रुग्णालयीन व्यवस्थेचा व स्वच्छतेचा आढावा घेतला.

महापौर श्रीमती रितू तावडे यांनी राजावाडी रुग्णालयातील महिला वैद्यकीय रुग्ण कक्ष, प्रसुती कक्ष, पुरुष वैद्यकीय कक्ष, प्रसूती कक्ष,प्रसुती पूर्व कक्ष, बालरोग विभाग, पुरुष शल्यचिकित्सा कक्षाला भेट देऊन रुग्णांशी संवाद साधला.



रुग्णांना बाहेरून औषधी आणाव्या लागत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेता, औषध पुरवठा व वितरण ,लसीकरणाचा पुरवठा व वितरण याची नोंदवही तपासून दैनंदिन व नियमितपणे लसीकरण होण्यासाठी संबंधितांना योग्य ती नोंद घेण्याचे निर्देश दिले. दूर्धर आजारामध्ये इंजेक्शनचा पुरवठा का होत नाही ? याची माहिती महापौरांनी घेतली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक लावण्याचे निर्देशही अधिष्ठातांना यावेळी दिले. राजावाडी रुग्णालयाचे पुनर्विकासाचे काम सुरू असून पहिल्या टप्प्यातील काम हे अतिशय संथ गतीने सुरू असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले असता, संबंधित अधिकाऱ्यांना महापौरांनी विचारणा केली. रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून बांधकामाचा संपूर्ण परिसर आच्छादित करण्याचे निर्देशही महापौरांनी यावेळी दिले. महापौरांनी यावेळी थाळी पद्धतीने होणाऱ्या अन्नपुरवठ्यामध्ये थाळीचा दर्जा चांगला ठेवण्याचे निर्देशही यावेळी दिले. त्याचप्रमाणे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून जुनी वायरिंग काढून नविन टाकण्याचे व रंगरंगोटी करण्याचे निर्देशही महापौरांनी यावेळी दिले.

यावेळी स्थानिक नगरसेवक धर्मेश गिरी,प्रमुख वैद्यकीय अधीक्षक (माध्यमिक आरोग्य सेवा) डॉ.पवार, वैद्यकीय अधीक्षका डॉ. भारती राजूलवाला उपस्थित होत्या.

# चड्डी-बनियान गँगच्या असभ्य गोंधळाबाबत काँग्रेसने जनतेची माफी मागावी- एकनाथ शिंदे

**मुंबई, प्रतिनिधी**

इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमधून जगापुढे भारताचे तंत्रवैभव सादर केले जात असताना भारत मंडपममध्ये युथ काँग्रेसच्या चड्डी-बनियान गँगने असभ्य गोंधळ घालून भारताची जागतिक स्तरावर नाचक्की केली. हे देशप्रेम नव्हे, हा एक प्रकारचा देशद्रोह आहे, अशी टीका शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. काँग्रेसने आणि त्यांच्या नेत्यांनी देशातील जनतेची माफी मागायला हवी, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे.



'एक्स'वरील पोस्टमध्ये उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काँग्रेसच्या या वृत्तीची तीव्र शब्दांत निंदा केली आहे. ते म्हणाले की भारत-अमेरिका कराराला विरोध असेल तर त्या विरोधाची कारणे सांगत सैद्धांतिक मांडणी काँग्रेसने केली पाहिजे. तसे न करता, भारत मंडपममध्ये गोंधळ घालून, देशाचे लोकप्रिय आणि कर्तृत्ववान पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या विरोधात घोषणाबाजी करून विदेशी पाहुण्यांसमोर आपल्याच देशाची प्रतिमा मलिन करण्याचा केविलवाणा प्रयत्न काँग्रेसने केला. परदेशात जाऊन भारताविषयी अपप्रचार करणारे राहुल गांधी यांच्यासारखे नेते असल्यानंतर त्यांच्या तरुण कार्यकर्त्यांकडून अपेक्षा तरी काय करणार असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला.

**शिवसेनेचे काँग्रेस विरोधात आंदोलन**

शिवसैनिकांनी शनिवारी दुपारी मुंबईतील बाळासाहेब भवन येथे काँग्रेस आणि राहुल गांधी विरोधात जोरदार आंदोलन केले. राहुल गांधी मुर्दाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. या आंदोलनात माजी महापौर दत्ता दळवी, माजी नगरसेवक कमलेश राय, शिवसेना सचिव चित्रपट सेना अध्यक्ष सुशांत शेलार, माजी नगरसेवक राजू पेडणेकर, दिलीप नाईक, विभागप्रमुख गणेश सानप, निलम पवार यांच्यासह महिला आघाडी, युवती सेना आणि मोठ्या संख्येने शाखा प्रमुख शिवसैनिक सहभागी झाले होते. काँग्रेस देशद्रोही आहे अशी घणाघाती टीका शिवसेनेच्या राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन.सी यांनी केली.

# भाजप कार्यालयासमोर युवक काँग्रेसचे तीव्र आंदोलन

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीनं यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आज दादर येथील वसंत स्मृती या भाजपा कार्यालयासमोर पोलिसांच्या दडपशाहीला झुगारून प्रचंड घोषणाबाजी करत भाजपच्या आंदोलनाला चोख प्रत्युत्तर दिले. यावेळी युवक कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी करून राहुल गांधी यांना गोळ्या घालून जीवे मारण्याची धमकी देणा-यांचा भाजप कार्यालयासमोर फुले उधळून निषेध केला.



आज सायंकाळच्या सुमारास मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीनं यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेस आंदोलन करणार असल्याने पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावला होता. पोलिसांची दडपशाही मोडून काढत झीनत शबरीनं यांच्या नेतत्वाखाली युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयसमोर पोहोचून तीव्र घोषणाबाजी केली आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना गोळ्या घालून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याच्या प्रकाराचा भाजपच्या कार्यालयासमोर फुले उधळून अनोख्या पद्धतीने निषेध केला. पोलिसांनी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन भोईवाडा पोलीस स्थानकात नेले.

यावेळी बोलताना झीनत शबरीनं म्हणाल्या की, आंदोलनादरम्यान आम्ही भाजपा कार्यालयासमोर प्रतीकात्मक फुलांचा वर्षाव करून "द्वेष आणि हिंसेच्या राजकारणाला महाराष्ट्रात स्थान नाही," असा स्पष्ट संदेश दिला. लोकशाहीत वैचारिक मतभेद असू शकतात; मात्र हिंसेच्या धमक्या देणे हे लोकशाहीच्या मूल्यांवर आघात आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेत्याला जीवे मारण्याच्या धमक्या देणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली पाहिजे. युवक काँग्रेस लोकशाही आणि संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी सातत्याने लढा देत राहील." पोलीस भाजप कार्यकर्त्यांना आंदोलन करायला मोकळी सूट देतात मात्र काँग्रेस कार्यकर्त्यांवर दडपशाही करतात. आंदोलन करण्यापूर्वीच कार्यकर्त्यांना ताब्यात घेतात, घरातून पोलीस घेऊन जातात. पण राहुल गांधी विरोधात भाजप जेव्हा आंदोलन करते तेव्हा पोलीस गायब असतात. पोलिसांनी युवक काँग्रेसवर दडपशाही करण्यापेक्षा राहुल गांधींना गोळ्या घालून जीवे मारण्याच्या धमक्या देणा-यांवर कारवाई केली पाहिजे असे शबरीनं म्हणाल्या.

# मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवेला अखेर १ मार्चचा मुहूर्त

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबई-कोकण प्रवास अतिजलद करता यावा यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार गेल्या ऑगस्ट २०२५ मध्ये, गणेशोत्सवादरम्यान ही सेवा सुरू होणार होती. मात्र काही कारणांमुळे ती सुरू होऊ शकली नाही. त्यामुळे गणेशोत्सवात बोटीने कोकणात जाण्याचे प्रवाशांचे स्वप्न अपूर्णच राहिले. आता मात्र शिमग्यात रो-रो सेवेद्वारे केवळ सहा तासांत कोकण गाठता येणार आहे. रखडलेल्या या सेवेसाठी अखेर १ मार्चचा मुहूर्त निश्चित करण्यात आला असून १ मार्चपासून मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा सुरू होत आहे. भाऊचा धक्का येथून १ मार्च रोजी सकाळी ८ वाजता पहिली 'एम टू एम' बोट सुटणार आहे. मात्र या अतिजलद जलप्रवासासाठी प्रवाशांना तीन ते नऊ हजार रुपये मोजावे लागणार आहेत.



सुसाट आणि सुखकर प्रवास मुंबई-कोकण असा दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्प अनेक वर्षे रखडल्याने रस्ते मार्गे प्रवास हा वेळखाऊ आणि गैरसोयीचा होत आहे, तर रेल्वे किंवा एसटीने कोकण गाठण्यासाठी किंवा कोकणातून मुंबईत परतण्यासाठी १२ ते १४ तास लागत आहेत. त्यातही गणेशोत्सव व अन्य काळात प्रवास अत्यंत वेदनादायी व कष्टप्रद होतो. या पार्श्वभूमीवर जलवाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून मुंबई -कोकण प्रवास सुसाट आणि सुखकर करण्याचा निर्णय सागरी मंडळाने घेतला. त्यानुसार मुंबई- विजयदुर्ग असा जलमार्ग निश्चित करण्यात आला.

**प्रवासी जेट्टीचे केले रो-रो जेट्टीत रूपांतर**

विजयदुर्ग येथील प्रवासी जेट्टीचे रो-रो जेट्टीत रूपांतर करण्याचे काम हाती घेण्यात आले. भाऊचा धक्का आणि विजयदुर्ग जेट्टी येथे आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यात आल्या. बोटीची चाचणीही पूर्ण करण्यात आली. ही सर्व तयारी पूर्ण करून ऑगस्ट २०२५ मध्ये गणेशोत्सवादरम्यान सेवा सुरू करण्याचे नियोजन होते. मात्र तांत्रिक अडचणी आणि परवानग्या मिळण्यासाठी झालेल्या विलंबामुळे सेवा सुरू होऊ शकली नाही. आता १ मार्चपासून मुंबई - विजयदुर्ग रो-रो सेवा सुरू होणार असल्याची माहिती सागरी मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

# खासगी रस्त्याचे नाव सांगून अतिक्रमणाची कारवाई टाळू नका - उच्च न्यायालय

**मुंबई, प्रतिनिधी**

पालिका प्रशासन विशिष्ट रस्त्याला 'खासगी रस्ता' असल्याचे सांगून तेथील अतिक्रमणांवरील कारवाई टाळू शकत नाही, असा महत्वपूर्ण निर्णय देत उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला कुठलेही कारण देत कारवाईमध्ये टाळाटाळ न करण्याची सक्त ताकीद दिली. जेव्हा रस्त्याला वर्षानुवर्षे सार्वजनिक रस्त्याचे स्वरूप मिळाले आहे, तेव्हा अतिक्रमणांवर कारवाई टाळण्यासाठी पालिका संबंधित रस्ता 'खासगी रस्ता' असल्याचे कारण देऊ शकत नाही, असेही खंडपीठाने सुनावले.

पवई येथील ९० फूट रुंदीच्या काँक्रीट रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याची तक्रार ब्यूमोंट एचएफएसआय या पूर्व-प्राथमिक शाळेने केली. याच शाळेने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. खंडपीठाने मुंबई महापालिका कायद्याच्या कलम ३१२ आणि ३१४ चे स्पष्टीकरण देत पालिकेला कर्तव्याची जाणीव करून दिली. कायद्यातील तरतुदी आयुक्तांना सूचना न देता अनधिकृत बांधकामे रोखण्याचा तसेच ती बांधकामे हटवण्याचा अधिकार देतात. सार्वजनिक आणि खासगी रस्त्यांमध्ये कोणताही फरक न करता ते हटवण्याचा अधिकार पालिका आयुक्तांना कायद्यातील स्पष्ट तरतुदींमुळे मिळालेला आहे, असे खंडपीठाने नमूद केले.

पवईतील रस्ता खासगी मालकीचा राहिल्याचे सांगत तो रस्ता कधीही महापालिकेच्या ताब्यात नव्हता तसेच सार्वजनिक निधी अतिक्रमण काढून टाकण्यासाठी वापरता येत नाही, असा युक्तिवाद पालिकेच्या वकिलांनी केला. त्यावर खंडपीठाने पालिकेच्या असमर्थतेवर बोट ठेवले. पालिका केवळ प्रशासनाकडे आधीपासून ताब्यात असलेल्या बांधकामावर कारवाई करू शकत आहे. ही पालिकेची भूमिका कचखाऊ असल्याचे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. कुठेही अतिक्रमण असणे हे पालिका अधिकाऱ्यांसाठी चिंतेचे कारण आहे. अतिक्रमणाने एखाद्या आजाराचे रूप धारण केले आहे, असे खंडपीठ म्हणाले.

# सीसीटीव्ही, चार्जिंग पॉइंट्स, स्मार्ट सिग्नलिंग अशा २१ नव्या सुविधांसह मोनोरेल पुन्हा सज्ज

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. दीर्घकाळ बंद असलेली मुंबई मोनोरेल आता पुन्हा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. आवश्यक सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यामुळे प्रवासी सेवा लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) नवीन रेक आणि सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीला मान्यता मिळाल्याची माहिती दिली.




ही सुरक्षा मान्यता 'ब्युरो व्हेरिटास' या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून देण्यात आली आहे. चेंबूर ते जेकब सर्कल या १९.५४ किमी मार्गावरील सेवा २०२५ मध्ये वारंवार बिघाडांमुळे बंद करण्यात आली होती. आता आवश्यक चाचण्या पूर्ण झाल्यानंतर मोनोरेल पुन्हा रुळांवर धावण्यास सज्ज झाली आहे.

ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ मध्ये मुसळधार पावसामुळे मोनोरेलची सेवा तीन वेळा बंद पडली होती. १५ सप्टेंबरला तांत्रिक बिघाडामुळे मोनोरेल अचानक थांबली. त्याआधी १९ ऑगस्टला गर्दीमुळे एक गाडी अडकली होती आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. या घटनांनंतर प्रवासी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आणि संपूर्ण व्यवस्था तपासण्याचा निर्णय घेण्यात आला.

एमएमआरडीएनुसार, नवीन रेक्सची आधी उत्पादन केंद्रात तपासणी करण्यात आली. त्यानंतर दोन महिने वेगवेगळ्या भागांवर चाचण्या घेण्यात आल्या. स्थिर आणि चालू स्थितीतील चाचण्या, तसेच सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीची पडताळणी करण्यात आली. सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच सुरक्षा मान्यता देण्यात आली.

# सुरेश प्रभू यांच्या जीवन प्रवासावर आधारित 'ध्येयधुंद' चे प्रकाशन

**मुंबई, प्रतिनिधी**

नकुल पार्सेकरलिखित आणि सुरेश प्रभू यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'ध्येयधुंद' पुस्तकाचे प्रकाशन शिवाजी पार्क येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय सभागृहात पार पडले. स्मारक कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भूषवले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या.

## महत्त्वाच्या बातम्या

### तात्पुरत्या स्वरूपात कामावर ठेवलेला चालक 'कर्मचारी'च -उच्च न्यायालय

**मुंबई, प्रतिनिधी**

एखाद्या विशिष्ट प्रवासासाठी तात्पुरत्या स्वरूपात कामावर ठेवलेला ड्रायव्हर आणि मालक यांच्यातही 'मालक-नोकर' असे नाते गृहीत धरले जाईल, असा महत्त्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे. मृत चालकाच्या कुटुंबाला १७ वर्षांपासून रखडलेली नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा करीत न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी हा निकाल दिला. या निकालाने असंघटित क्षेत्रातील कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. कामगार आयुक्तांचा २०१२ मधील आदेश उच्च न्यायालयाने रद्द केला. चालकाचा नोकरीचा कोणताही कायमस्वरूपी पुरावा नसल्याचे सांगत भरपाई नाकारण्यात आली होती. त्या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. २९ मार्च २००९ रोजी तिलकधारी गुप्ता हे जवाहरलाल गुप्ता यांच्या मालकीची टोयोटा क्वालिस गाडी चालवत होते. गुप्ता व त्यांचे कुटुंबीय एका अंत्यविधीसाठी राजस्थानला जात असताना गाडीचा अपघात झाला. अपघातात चालक तिलकधारीचा मृत्यू झाला, तर गाडीतील इतर प्रवासी जखमी झाले. मृत चालकाची पत्नी शकुंतला गुप्ता आणि त्यांच्या तीन अल्पवयीन मुलांनी कर्मचारी नुकसानभरपाई कायद्यांतर्गत भरपाईसाठी अर्ज केला होता.

### हप्त्यापोटीच्या वेतनवाढ फरक निधीसाठी एसटीला १०० कोटी

**मुंबई, प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांना वेतनासोबत या महिन्यात वेतनवाढ फरक हप्ता न मिळाल्याने असंतोष पसरला होता. त्यामुळे राज्य सरकारच्या अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांचा निषेध करत 'बोंब मारो' आंदोलनाची नोटीस एसटी कर्मचाऱ्यांतर्फे देण्यात आली होती. या नोटीसनंतर निधी देण्यास अर्थ खात्याने हिरवा कंदील दाखवत तात्पुरत्या स्वरूपात १०० कोटी रुपये इतकी रक्कम एसटीला देण्यात आली आहे. त्यामुळे २४ फेब्रुवारीपासून आझाद मैदानात होणारे बोंब मारो आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी एस एसटी महामंडळातील सर्व श्रमिक संघटनाच्या बैठकीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सन २० ते २४ या कालावधीचा वेतनवाढ फरक देण्याचा अत्यंत चांगला व मोठा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे समान ४८ हप्त्यात सदरची रक्कम देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

### पंपिंग स्टेशन उभारणीच्या कामाला वेग

**मुंबई, प्रतिनिधी**

दरवर्षी पावसाळ्यात कुर्ला - सायन रेल्वे स्थानकादरम्यान रुळांवर पाणी जमा होते आणि मुंबईच्या लाइफलाइनला ब्रेक लागतो. परंतु आता कुर्ला-सीएसएमटी रोड, माहीम कॉजवे व वाकोला नदीजवळ पंपिंग स्टेशन उभारणीसह अन्य कामाला प्रत्यक्षात सुरुवात केली आहे. त्यामुळे येणाऱ्या पुढील काळात पावसाळ्यात कुर्ला-सायन रेल्वे स्थानका दरम्यान रुळांवर पाणी भरण्यापासून मुक्तता होणार असून रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. भरतीच्या वेळी तसेच विहार आणि पवई तलावामधील ओसंडून वाहणाऱ्या पाण्यामुळे लाल बहादूर शास्त्री मार्ग, सायन आणि कुर्ला रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे रुळांवर दरवर्षी पाणी भरते. परंतु आता पंपिंग स्टेशन उभारणीमुळे रुळांवर पाणी तुंबण्याच्या कटकटीतून सुटका होणार आहे. मुंबई महापालिकेच्या अखत्यारित असलेल्या मिठी नदी प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करण्यात आले असून त्यातील टप्पा एक अंतर्गत मिठी नदीचे १६ ते ६० मीटरपर्यंत रुंदीकरण व गाळ काढण्याचे काम पूर्ण झाले आहे, तर टप्पा दोन अंतर्गत चितळे समिती, केंद्रीय जल विद्युत अनुसंधान संस्था आणि आयआयटी मुंबई यांनी सादर केलेल्या अहवाल तथा शिफारशीनुसार मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांनी मिठी नदी विकास प्रकल्प आराखडा तयार करण्यात आला आहे.

### हलाव पुलावर मेट्रोचे गर्डर प्रस्थापित

**मुंबई, प्रतिनिधी**

एमएमआरडीएमार्फत डीएननगर ते मंडाले मेट्रो २ ब मार्गिकअंतर्गत कुर्ला येथील हलाव पुलावर दोन यू-गर्डर न्वसवण्यात आले. शनिवारी पहाटे ४ वाजता हे काम पूर्ण झाले. मेट्रो २ ब ही मुंबईला पूर्व-पश्चिम जोडणारी मार्गिका असून डीएननगर, वीकेसी, कुर्ला, चेंबूर व मंडाले या प्रमुख निवासी व व्यापारी केंद्रांनाही जोडते. व्हलाव पूल परिसर विमानतळाच्या फनेल झोनमध्ये येत असल्याने मेट्रो व्हायाडक्ट व विद्यमान पूल यांच्यामधील उभ्या अंतराची मर्यादा केवळ ३.५ मीटर आहे. हलाव पुलासमोरील एस. जी. बर्वे मार्ग मेट्रो स्थानक विमानवाहतूक उंची निकषांनुसार एकस्तरीय स्वरूपात नियोजित करण्यात आले आहे. स्थानकाच्या पायाभूत व पिअर कामांसह व्हलाव पुलाच्या दोन्ही बाजूंवरील व्हायाडक्टचे काम पूर्ण झाले आहे. प्रत्येकी २० मीटर लांबीचे दोन यू-गर्डर हे ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या क्रेनद्वारे उभारण्यात आले. या टप्प्यानंतर प्रकल्प ट्रॅक बसविणे, ओव्हरहेड कॅटेनरी प्रणाली, वीजपुरवठा व्यवस्था व दूरसंचार पायाभूत सुविधा अशी कामे हाती घेतली जात आहेत.

### केईएममध्ये आयव्हीएफ सेंटर सुरू होणार

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांपैकी एक असलेल्या केईएम रुग्णालय येथे आयव्हीएफ' (इन विट्रो फर्टिलायझेशन) सेंटर सोमवारी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सुरू करण्यात येणार आहे. महापालिकेच्या वतीने अत्याधुनिक उपकरणे, प्रशिक्षित तज्ज्ञ डॉक्टर आणि स्वतंत्र प्रयोगशाळा सुविधांसह हे केंद्र उभारले जाणार आहे. वंध्यत्व ही लाखो दांपत्यांसमोरील संवेदनशील समस्या असून सार्वजनिक रुग्णालयात अत्याधुनिक प्रजनन तंत्रज्ञान उपलब्ध होणे ही सामाजिक दृष्टीने महत्त्वाची पायरी मानली जाते.' आयव्हीएफ केंद्रामुळे परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण उपचार मिळून अनेक कुटुंबांना पालकत्वाचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या केंद्रात हार्मोन तपासण्या, अंडाणू संकलन, भ्रूण निर्मिती व प्रत्यारोपण यांसह संपूर्ण आयव्हीएफ प्रक्रिया एकाच छपाखाली फेली जाणार आहे. तसेच रुग्णांसाठी समुपदेशनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे केंद्र डॉ. अंजली मालपानी आणि डॉ. अनिरुद्ध मालपानी यांच्या पुढाकारातून साकारले असून त्यांनी आपल्या मातृसंस्थेला देणगी स्वरूपात सहकार्य केले आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर उभारलेले हे केंद्र आधुनिक भ्रूणविज्ञान प्रयोगशाळा, डिजिटल वैद्यकीय नोंदी आणि प्रगत आयव्हीएफ तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे.

### आदिवासी भागातील रिक्त पदे भरण्यासाठी सरकारचा निर्णय

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य विभागातील नवीन पदभरती करताना तसेच सेवांतर्गत पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रथम आदिवासी भागात नियुक्ती देण्यात येणार आहे. आदिवासी व दुर्गम भागातील रिक्त पदे प्राधान्याने भरल्यानंतरच बिगर आदिवासी भागातील पदभरती केली जाणार आहे. या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय आरोग्य विभागाकडून जारी करण्यात आला असून, या निर्णयामुळे आदिवासी भागातील विशेषतज्ञ डॉक्टरांसह सर्व संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरली जाणार आहेत. गेल्या वर्षभरात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील विविध आदिवासी व दुर्गम जिल्ह्यांतील आरोग्य संस्थांना भेटी देत प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्यानंतरच 'ट्रायबल फर्स्ट' धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. आदिवासी भागात पायाभूत सुविधा, निवास व्यवस्था आणि अन्य सोयी-सुविधांच्या अभावामुळे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने अनेक पदे दीर्घकाळ रिक्त राहत होती. परिणामी रुग्णसेवेवर परिणाम होत होता. नव्या धोरणानुसार बिगर आदिवासी भागात सेवा बजावणाऱ्या अधिकाऱ्यांनाही आवश्यकतेनुसार आदिवासी व दुर्गम भागात सेवा द्यावी लागणार आहे.

# संपादकीय

## ट्रम्प यांच्या मनमानीवर लगाम

"मला टॅरिफ आवडतात; तो माझा आवडता शब्द आहे," असे म्हणत मिरवणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष Donald Trump यांना अमेरिकेच्या Supreme Court of the United States ने जोरदार धक्का दिला आहे. भारतासह अनेक देशांवर लादलेले टॅरिफ बेकायदेशीर ठरवत सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या अधिकारमर्यादेची जाणीव करून दिली. विशेष म्हणजे, ट्रम्प यांनीच नियुक्त केलेल्या दोन न्यायाधीशांनीही त्यांच्या टॅरिफ धोरणाला घटनाबाह्य ठरवले. यावरून स्पष्ट होते की टॅरिफच्या बाबतीत नियम-कायद्यांची पायमल्ली होत होती.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणाची हवा काढणारा तर आहेच, पण राजकीयदृष्ट्याही त्यांना कमकुवत करणारा ठरू शकतो. टॅरिफ धोरणाच्या माध्यमातून ते आपल्या समर्थकांमध्ये "अमेरिकेला श्रीमंत बनवत आहोत" असा संदेश देत होते. मात्र न्यायालयीन निर्णयामुळे त्यांच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. विशेषतः मध्यावधी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय त्यांच्या लोकप्रियतेवर परिणाम करू शकतो.

तथापि, ट्रम्प सहज हार मानणारे नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर काही तासांतच त्यांनी कार्यकारी आदेशाद्वारे सर्व देशांवर दहा टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली. जरी ही मुदत पाच महिन्यांची असली, तरी या काळात ते इतर कायदेशीर पर्याय शोधू शकतात. उदाहरणार्थ, "अमेरिकेसोबत अन्यायकारक व भेदभावपूर्ण व्यापार" केल्याचा आरोप करून काही देशांवर अतिरिक्त टॅरिफ लादणे किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहोचवणाऱ्या आयातींवर निर्बंध आणणे. मात्र अशा कारवाईसाठी तपास आणि ठोस पुरावे आवश्यक ठरतील.

"अमेरिकेला पुन्हा महान बनवू" या घोषणेच्या आडून ट्रम्प अनेकदा आक्रमक आणि अनपेक्षित निर्णय घेत आले आहेत. देशांतर्गत प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्यासाठी ते आंतरराष्ट्रीय पातळीवर तणाव वाढवू शकतात. इराणविरोधी आक्रमक भूमिका, क्युबासह इतर देशांवरील दबाव वाढवणे—अशा शक्यता नाकारता येत नाहीत.

या पार्श्वभूमीवर भारताने सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. जरी अमेरिका-भारत यांच्यात अंतरिम व्यापार करार झाला, तरी धोरणांमध्ये अचानक बदल होण्याची शक्यता कायम राहील. ट्रम्प यांच्या भूमिकेत सातत्य नसल्याची प्रतिमा निर्माण झाली आहे. त्यामुळे भारताने आर्थिक व कूटनीतिक पातळीवर संतुलित आणि सावध धोरण अवलंबणे गरजेचे आहे.

एकूणच, अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने कार्यकारी सत्तेवर नियंत्रण ठेवण्याची लोकशाही व्यवस्था किती सक्षम आहे, हे दाखवून दिले. मात्र ट्रम्प यांच्या राजकीय शैलीचा विचार करता, टॅरिफ वाद इथेच थांबेल असे मानणे धाडसाचे ठरेल. पुढील काही महिने जागतिक व्यापार आणि आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी निर्णायक ठरू शकतात.

## मातृभाषांच्या स्वाभिमानाला सिंचनाची गरज

दरवर्षी २१ फेब्रुवारी हा दिवस जगभरातील मातृभाषांच्या जखमी स्वाभिमानाला नवसंजीवनी देण्याचा संकल्प घेऊन येतो. १९९९ मध्ये UNESCO ने या दिवसाला 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन' म्हणून मान्यता दिली. यामागील मूलभूत विचार असा की सांस्कृतिक वैविध्य टिकवायचे असेल, तर भाषांचे जतन अपरिहार्य आहे. या दिनाचे ऐतिहासिक मूळ पूर्व पाकिस्तानातील (आताचा बांगलादेश) 'बांग्ला भाषा आंदोलन'ात आहे. तेव्हा पाकिस्तान सरकारने उर्दू लादण्याचा निर्णय घेतला होता.

२१ फेब्रुवारी १९५२ रोजी ढाका विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आणि काही सामाजिक संस्थांनी या निर्णयाविरोधात निदर्शने केली. पोलिसांच्या गोळीबारात अनेक विद्यार्थी मृत्युमुखी पडले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ युनेस्कोने हा दिवस मातृभाषा दिन म्हणून जाहीर केला. 'मदर टंग' नव्हे, तर 'मदर लँग्वेज'—म्हणजे व्यक्तीची मूळ भाषा, जी तिच्या ओळखीचा आणि मानसिक घडणीचा पाया असते.

प्रत्येक भाषेची रचना तिच्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भांवर आधारलेली असते. भाषा आपल्याला इतिहास, पुराणकथा, परंपरा आणि लोकस्मृतीशी जोडते. हा संबंध सामूहिक अस्मितेला आकार देतो. आपल्या संस्कृतीची धडधड शब्दांमध्ये, प्रतीकांमध्ये आणि बिंबांमध्ये दडलेली असते. परंतु जागतिकीकरणाच्या वेगवान प्रवाहात अनेक भाषा अस्तित्वाच्या संघर्षात अडकल्या आहेत. 'एकसमान संस्कृती' आणि 'एकसमान सभ्यता'च्या कल्पनेने विकासशील व अल्पविकसित देशांच्या भाषांसमोर मोठी आव्हाने उभी केली आहेत.

युनेस्कोच्या अहवालानुसार दर दोन आठवड्यांनी एक भाषा लुप्त होते. लवकरच सुमारे १५०० भाषा वापरकर्त्यांच्या अभावामुळे व्यवहारातून नाहीशा होऊ शकतात. एखादी भाषा संपली की तिच्यासोबत एक स्वतंत्र संस्कृती, एक स्वतंत्र जीवनदृष्टीही हरवते.

मुलांसाठी शिक्षणाचे सर्वोत्तम माध्यम त्यांच्या मातृभाषेत असते. मातृभाषेत शिकणारी मुले संकल्पना अधिक लवकर आणि सखोल समजून घेतात. तरीही जगभरातील सुमारे ४० टक्के मुले घरात बोलल्या जाणाऱ्या भाषेत शिक्षण घेऊ शकत नाहीत, ही चिंतेची बाब आहे. यंदाच्या आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाची थीम आहे—'बहुभाषिक शिक्षणाच्या भविष्यात युवकांची भूमिका.'

Mahatma Gandhi यांनी मातृभाषेला मानसिक विकासासाठी तितकेच आवश्यक मानले, जितके शारीरिक विकासासाठी आईचे दूध आवश्यक असते. Rabindranath Tagore यांनी विज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचवायचे असेल, तर ते मातृभाषेतूनच शिकवले पाहिजे, असे प्रतिपादन केले. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतले असतानाही त्यांनी Visva-Bharati University ची स्थापना करताना शिक्षणाचे माध्यम म्हणून बांग्ला निवडली.

मातृभाषेत शिक्षण घेऊन यशाच्या शिखरावर पोहोचण्याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे A. P. J. Abdul Kalam. त्यांनी गणित व विज्ञानाचे शिक्षण तमिळ मातृभाषेत घेतल्यामुळेच आपण उत्तम वैज्ञानिक बनू शकलो, असे त्यांनी नमूद केले होते.

भारत सरकारने National Education Policy 2020 अंतर्गत प्रारंभिक शिक्षण मातृभाषेत देण्यावर भर दिला आहे. बहुभाषिक शिक्षण प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची संकल्पनाशक्ती आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. जगातील अनेक प्रगत देश—जपान, जर्मनी, फ्रान्स—आपल्या मातृभाषेतूनच ज्ञानार्जन करून प्रगती साधत आहेत. सकल देशांतर्गत उत्पादनात आघाडीवर असलेले बहुतेक देश आपल्या भाषेतच कामकाज करतात, हे संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

भाषा ही मानवी संस्कृतीची टकसाल आहे. प्रत्येक भाषा एका संस्कृतीची कथा जपून ठेवते. शब्दसृष्टीच्या अनंत शक्यता तिच्यात दडलेल्या असतात. म्हणून मातृभाषांचा स्वाभिमान जपणे, त्यांना सक्षम करणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.

भारतीय भाषिक वैविध्य हा आपल्या देशाचा अनमोल ठेवा आहे. युवा पिढीने मातृभाषेला आपल्या अस्तित्वाचे कवच मानून तिची शक्ती, सामर्थ्य आणि सौंदर्य विसरू नये. जागतिक स्पर्धेत उतरतानाही आपल्या भाषेचा आत्मविश्वास अबाधित ठेवणे हीच खरी प्रगती ठरेल. मातृभाषांचा सन्मान म्हणजे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे संरक्षण—आणि हे कार्य आपण सर्वांनी एकत्रितपणे हाती घ्यायला हवे.

# भारतात बहरत असलेली नवी वैज्ञानिक चेतना

भारताच्या एखाद्या मोठ्या शहराच्या चकाकीपासून दूर, ओडिशा किंवा छत्तीसगडमधील अशा एखाद्या जिल्ह्यात—जिथे मोबाईलचे सिग्नलही कधीमधीच पोहोचतात—तिथे १४ वर्षांचा एक मुलगा जुन्या कार्डबोर्ड, काही तारा आणि स्वस्त सेन्सर घेऊन बसला आहे. तो खेळणे बनवत नाही; तो अशी यंत्रणा तयार करत आहे जी मातीमध्ये नायट्रोजनची कमतरता भासल्यास त्याच्या वडिलांच्या मोबाईलवर संदेश पाठवेल. जेन-जीच्या गदारोळात आणि जनरेटिव्ह एआयच्या झगमगाटात आजच्या भारताचे हे असे चित्र आहे, ज्याकडे मुख्य प्रवाहातील माध्यमे अनेकदा कमी लक्ष देतात.

हे चित्र आहे Atal Innovation Mission या उपक्रमाचे. देशभर उभारण्यात आलेल्या Atal Tinkering Labsच्या माध्यमातून विज्ञानाला पाठांतराचा विषय न मानता अनुभवाचा भाग बनवणारी पिढी तयार होत आहे. दहा वर्षांची ही कहाणी केवळ यंत्रांची नाही; ती आत्मविश्वासाची आहे—ज्याने भारताला 'जुगाड'च्या देशातून 'इनोव्हेशन'च्या जागतिक केंद्राकडे वळवले आहे.

### विज्ञान शिक्षणाचे नवे व्याकरण

भारतामध्ये विज्ञान शिक्षण अनेक विद्यार्थ्यांसाठी कंटाळवाणे ओझे राहिले आहे. वर्गात 'प्रकाशाचे परावर्तन' किंवा 'ओहमचा नियम' फळ्यावर काढले जात; पण त्याचा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी काय संबंध आहे, हे समजत नसे. प्रयोगशाळा केवळ औपचारिकतेपुरती मर्यादित असे. उपकरणे अभ्यासक्रमापुरतीच वापरली जात; त्यामुळे अनेक विद्यार्थी प्रयोग समजून घेण्याऐवजी गुण मिळवण्यावर भर देत.

दहावी नंतर अनेक विद्यार्थी वाणिज्य किंवा कला शाखेकडे वळत; यात मुलींचे प्रमाण अधिक असे. मात्र अटल टिंकरिंग लॅब्समुळे या व्यवस्थेत बदल झाला. सहावीपासूनच 'स्वतः करून पाहा' ही संस्कृती रुजली. देशभरातील १० हजारांहून अधिक लॅब्समध्ये विद्यार्थी थ्री-डी प्रिंटर चालवतात, रोबोटिक्स किट जोडतात आणि सेन्सरची रचना समजून घेतात. विज्ञान पुस्तकांतून बाहेर पडून त्यांच्या हातात जिवंत होते.

इथे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (एसटीईएम) हे विषय केवळ सिद्धांत न राहता प्रयोगातून शिकवले जातात. जिज्ञासा, समस्या-निराकरण आणि सर्जनशीलता विकसित होते. प्रकल्पांमधून टीमवर्क आणि उद्योजकतेची बीजे पेरली जातात. पाठांतरापासून शोधाकडे नेणारा हा बदलच विज्ञानाची खरी ताकद आहे.

### डीप टेकचा वाढता विस्तार

या आठवड्यात नवी दिल्ली येथे झालेल्या AI Impact Summit 2026कडे लक्ष दिल्यास लक्षात येईल की भारत डीप टेकच्या उंबरठ्यावर उभा आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस सॉफ्टवेअर क्षेत्रात जशी झेप घेतली, तशीच संधी आज कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स आणि ब्लॉकचेनमध्ये आहे.



डीप टेक म्हणजे सखोल वैज्ञानिक संशोधनावर आधारित तंत्रज्ञान. अवकाशापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत भारत आपली छाप उमटवत आहे. पार्श्वभूमीला अटल टिंकरिंग लॅब्स, इस्रोचे प्रकल्प आणि विज्ञान-तंत्रज्ञान विभागाचे कार्यक्रम या पायाभूत कामगिरी करत आहेत. सहावीतला विद्यार्थी सेन्सर कसा कार्य करतो हे समजतो आणि नववीतील विद्यार्थी कार्यरत उपग्रहाचे मॉडेल तयार करतो—तेव्हा भविष्यातील डेटा सायंटिस्ट, एआय तज्ज्ञ आणि स्पेस इंजिनिअर तयार होत असतात.

### विज्ञान उद्योजकतेची चमक

नव्या पिढीच्या विज्ञानाकडे वाढत्या ओढीचा सर्वात क्रांतिकारी पैलू म्हणजे विज्ञान-उद्योजकता. मुंबईत झालेल्या भारत-फ्रान्स इनोव्हेशन फोरममध्ये Narendra Modi यांनी अटल इनोव्हेशन मिशनने १०० हून अधिक इन्क्युबेटर्स आणि डीप-टेक स्टार्टअप्सना जोडल्याचे नमूद केले. शालेय स्तरावर अटल टिंकरिंग लॅब्स ही सुरुवात असून पुढे मार्गदर्शन, शिष्यवृत्ती आणि भांडवलाची साथ मिळते.

हॅकाथॉनमधून घडलेली ही तरुण वैज्ञानिक मेधा केवळ प्रकल्प तयार करत नाही; ती भविष्यातील युनिकॉर्न कंपन्यांची पायाभरणी करत आहे. कल्पनेपासून पेटंटपर्यंतचा प्रवास सुलभ झाला आहे. दमदार कल्पना असल्यास विद्यार्थ्यांना इन्क्युबेशन सेंटर्स आणि गुंतवणूकदारांशी जोडले जाते.

जागतिक नवोपक्रम निर्देशांकात भारताची सुधारलेली क्रमवारी या १० हजारांहून अधिक लॅब्समुळेच शक्य झाली आहे. तरुण आता केवळ कोड लिहित नाहीत; ते हार्डवेअर आणि डीप टेकमध्येही हात आजमावत आहेत. इस्रोच्या लघुउपग्रह प्रकल्पांत शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग हे त्याचे उदाहरण आहे.

### जिथे समस्या हीच प्रयोगशाळा

मोठे नवोपक्रम एसी खोलीत नव्हे तर वास्तवातील समस्यांतून जन्म घेतात. ग्रामीण भारतात शेती, पाणी, वीज आणि आरोग्याच्या आव्हानांचा डोंगर आहे. मध्यप्रदेशातील शिवपुरी येथील विद्यार्थ्यांनी साप दूर ठेवणारी स्मार्ट काठी तयार केली; आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे एका विद्यार्थिनीने रेल्वे अपघात टाळण्याच्या प्रणालीवर काम सुरू केले. त्यांच्या प्रेरणेच्या मागे वैयक्तिक अनुभव आणि समाजाची वेदना आहे.

ही उदाहरणे लहान वाटू शकतात; पण त्यामागील भावनाच असामान्य आहे. इंटरनेट आणि ओपन-सोर्स प्रकल्पांमुळे ही मुले एकमेकांचे प्रयोग पाहतात, समजून घेतात आणि सुधारतात. अशा रीतीने डीप टेकची पायाभरणी समाजाच्या तळागाळात होते.

### नवोपक्रमाच्या वाटेवर

जर तुम्ही जिज्ञासू विद्यार्थी असाल, तर विज्ञानाला मित्र बनवा.

समस्या ओळखा: आजूबाजूला काय त्रासदायक आहे ते पाहा.

प्रयोग करा: शाळेच्या प्रयोगशाळेत निर्भयपणे हाताळणी करा. अपयशाची भीती बाळगू नका.

पेटंटचे महत्त्व ओळखा: कल्पना नवी असेल तर नोंदणी करा. स्टार्टअप बौद्धिक संपदा संरक्षण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सवलती मिळतात.

२०४७ मध्ये स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात भारताचा भविष्यलेख हीच पिढी लिहिणार आहे—धरतीपासून अंतराळापर्यंत. विज्ञान ही केवळ शाखा नाही; ती राष्ट्रनिर्मितीची सर्वात मोठी शक्ती आहे.

# एआय : संधीसोबत आव्हानही, भारताकडून जगाला अपेक्षा

नवी दिल्ली येथे पार पडलेल्या AI Impact Summit 2026 ने जागतिक स्तरावर मोठे लक्ष वेधले आणि या परिषदेला असलेले महत्त्व अधोरेखित केले. यापूर्वी झालेल्या तीन जागतिक एआय परिषदांच्या तुलनेत या वेळी एआय कंपन्यांचे दिग्गज, विविध देशांचे प्रमुख, उद्योगजगताचे प्रतिनिधी आणि तंत्रज्ञानतज्ज्ञ यांचा व्यापक सहभाग दिसून आला. त्यामुळे ही परिषद केवळ औपचारिक न राहता परिणामकारक ठरली.




या परिषदेत पंतप्रधान Narendra Modi यांनी एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्पष्ट केले की एआय केवळ मशीनकेंद्रित न राहता मानवकेंद्रित असावे. ते उत्तरदायी, सुरक्षित, लोकशाहीवादी आणि सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाची प्रगती ही मानवी मूल्यांशी सुसंगत असली पाहिजे, हा त्यांचा ठाम संदेश होता.

पंतप्रधानांनी भारताच्या एआयविषयक प्राधान्यांचा उल्लेख करत जागतिक समुदायासमोर "एमएएनएव्ही" (MANAV) हे दृष्टीकोन मांडले. एम म्हणजे नैतिक (Moral & Ethical), ए म्हणजे उत्तरदायी (Accountable), एन म्हणजे राष्ट्रीय सार्वभौमत्व (National Sovereignty), ए म्हणजे सर्वांसाठी उपलब्ध आणि समावेशक (Accessible & Inclusive), तर व्ही म्हणजे वैध व प्रामाणिक (Valid & Legitimate). याचा अर्थ एआय प्रणाली नैतिकतेवर आधारित, जबाबदार, डेटावरील अधिकार सुनिश्चित करणारी, सर्वांना उपलब्ध आणि कायदेशीर चौकटीत बसणारी असावी.

भारत एआयमध्ये भविष्य पाहत असल्याने केंद्र सरकार या क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यास प्रोत्साहन देत आहे. जगभरातील एआय कंपन्यांनी भारतासोबत सहकार्य करावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या परिषदेतून हे स्पष्ट झाले की भारताची तांत्रिक क्षमता जागतिक कंपन्यांना आकर्षित करत आहे. भारत त्यांच्यासाठी मोठी बाजारपेठ आहे, तसेच कुशल मनुष्यबळाचा महत्त्वाचा स्रोतही आहे. अमेरिकेनंतर ChatGPT चे सर्वाधिक वापरकर्ते भारतात आहेत. विद्यार्थी, उद्योगजगत आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिक मोठ्या प्रमाणात एआय साधनांचा वापर करत आहेत. शासनही शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग आणि प्रशासनात एआयचा वापर वाढवण्यावर भर देत आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात एआयचा सेवा क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच 'भारत विस्तार' या उपक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांसाठी एआयआधारित बहुभाषिक प्रणाली विकसित करण्याची घोषणा झाली. आर्थिक सर्वेक्षणातही एआयला आर्थिक रणनीतीचा भाग मानले गेले. इंटरनेटच्या वापरात अग्रस्थानी असलेला भारत एआयच्या वापरातही आघाडीवर जाईल, यात शंका नाही. मात्र बहुतांश मोठ्या एआय कंपन्या अमेरिकन असल्याने त्या भारतात आपले वर्चस्व वाढवत आहेत, ही बाब लक्षात घ्यावी लागेल.

यामुळे काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. भारतीय वापरकर्त्यांचा डेटा भारतीय अधिकारक्षेत्रात राहील का? परदेशी कंपन्या भारतीय डेटाचा वापर करून आपल्या एआय मॉड्यूल्सना बळकट करत असताना त्या आर्थिक लाभात भारताला योग्य हिस्सा देतील का? डेटा सार्वभौमत्व आणि नफा-वाटपाचा मुद्दा भविष्यात निर्णायक ठरणार आहे.

सध्या जागतिक स्तरावर एआय कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. काही तज्ज्ञांच्या मते, या कंपन्या आपले एकाधिकार वाढवत आहेत. अमेरिकन कंपन्यांमध्ये




Google, OpenAI आणि Meta यांचे वर्चस्व स्पष्ट दिसते. चीनमधील काही कंपन्या स्पर्धा करत असल्या तरी त्यांचा प्रभाव तुलनेने कमी आहे. युरोपसह इतर देश एआय विकासात मागे पडताना दिसतात. भारत तिसरी मोठी ताकद बनण्याच्या तयारीत असला, तरी भारतीय कंपन्यांनी स्वयंपूर्णता साधून स्वतंत्र ओळख निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

परिषदेदरम्यान एका खासगी विद्यापीठाने चिनी एआय साधनाला स्वतःची निर्मिती म्हणून सादर केल्याची घटना भारतासाठी अस्वस्थ करणारी ठरली. एआय विकासाच्या नावाखाली परकीय तंत्रज्ञानाची नुसती नक्कल होऊ नये, याची दक्षता सरकारने घ्यायला हवी. उद्योगक्षेत्र आणि शैक्षणिक संस्था यांनीही याची जाणीव ठेवावी.

भारतातील तरुण एआय साधनांचा वापर करीत असले तरी या तंत्रज्ञानाची कार्यपद्धती आणि संभाव्य दुरुपयोग याबाबत पुरेसे ज्ञान नसल्याचे दिसते. शालेय आणि उच्च शिक्षणात एआयविषयी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करण्याची गरज आहे. तसेच नव्या एआय-आधारित नोकऱ्या निर्माण होण्यापूर्वी पारंपरिक रोजगारांवर मोठा परिणाम होऊ नये, याचीही काळजी घ्यावी लागेल.

या परिषदेत भारताने एआयच्या दुरुपयोगावर नियंत्रण ठेवण्याची गरज ठळकपणे मांडली. ८६ देशांनी ज्या घोषणापत्रावर स्वाक्षऱ्या केल्या, त्यातून जागतिक सहमती दिसते; मात्र त्याची अंमलबजावणी कशी होईल, हे अद्याप स्पष्ट नाही. एआयचा वापर वेगाने वाढणार असल्याने त्यासाठी सक्षम नियामक चौकट उभारणे ही काळाची गरज आहे. ट्रायसारखी स्वतंत्र नियामक संस्था निर्माण करून एआयच्या दुरुपयोगावर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल.




जर योग्य नियमन केले नाही, तर एआयचा वापर समाजात भ्रम, दिशाभूल आणि विघटन निर्माण करण्यासाठी होऊ शकतो. म्हणूनच सरकारने एआयच्या विकासावर आणि वापरावर सतत लक्ष ठेवणे, त्याची वेळोवेळी समीक्षा करणे आणि आवश्यक सुधारणा करणे अनिवार्य आहे.

एआय ही निश्चितच मोठी संधी आहे; परंतु त्या संधीसोबत गंभीर आव्हानही आहे. भारताने या दोन्ही पैलूंना समतोल राखत पुढे गेले, तरच तो एआय क्षेत्रात जागतिक नेतृत्वाची भूमिका निभावू शकेल.

# अजितदादांच्या 'बारा' शिलेदारांचा शरद पवारांच्या गोटात डोकावण्याचा प्रयत्न

## राज्यसभेच्या रणांगणात महायुतीची धाकधूक वाढली!

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात विलीनीकरणाच्या चर्चांना उधाण आलेले असतानाच एक मोठी खळबळजनक माहिती समोर येत आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे किमान १२ आमदार सध्या शरद पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात असल्याची खात्रीलायक चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अजितदादांच्या निधनानंतर पक्षात निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी आणि राजकीय भवितव्याची चिंता, या कारणांमुळे हे आमदार पुन्हा एकदा 'साहेबांच्या' सावलीत जाण्यासाठी इच्छुक असल्याचे बोलले जात आहे.

या अंतर्गत घडामोडींमुळे अवघ्या काही दिवसांवर आलेल्या राज्यसभा निवडणुकीची गणिते पूर्णपणे विस्कटण्याची चिन्हे आहेत. राज्यसभेच्या ७ जागांसाठी होणाऱ्या मतदानामध्ये प्रत्येक मत निर्णायक असते. जर हे १२ आमदार विलीनीकरणाच्या मुद्द्यावरून शरद पवारांच्या बाजूने झुकले किंवा त्यांनी मतदानात वेगळी भूमिका घेतली, तर महायुतीला आपल्या हक्काच्या जागा निवडून आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. विलीनीकरणासाठी शरद पवार गटाकडून अधिकृत प्रस्तावाची प्रतीक्षा असली तरी, पडद्यामागे सुरू असलेल्या या हालचालींनी महायुतीच्या बालेकिल्ल्याला तडे जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

मुंबईत झालेल्या अजित पवार गटाच्या बैठकीतही विलीनीकरणाच्या मुद्द्यावर आमदारांनी आपली मते मांडल्याचे समजते. शरद पवार यांच्या अनुभवी नेतृत्वाखाली पुन्हा एकत्र काम केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत फायदा होईल, असा एक मोठा गट पक्षात सक्रिय झाला आहे. जर राज्यसभा मतदानापूर्वी या १२ आमदारांच्या भूमिकेत बदल झाला, तर महाविकास आघाडीला अनपेक्षितपणे एक अतिरिक्त जागा जिंकण्याची संधी मिळू शकते. पर्यायाने, महायुतीसाठी ही निवडणूक आता केवळ औपचारिक न राहता 'अस्तित्वाची लढाई' ठरण्याची शक्यता आहे.

# क्रिकेटच्या देवाघरी सनई-चौघड्यांचे सूर मुख्यमंत्री अन् उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीने अर्जुनच्या लग्नाची चर्चा जोरात!

**मुंबई, प्रतिनिधी**



क्रिकेटचा 'मास्टर ब्लास्टर' भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या घरी लवकरच लगीनघाई सुरू होणार असून, या शाही विवाहसोहळ्याची पहिली निमंत्रण पत्रिका राज्याच्या धुरिणांपर्यंत पोहोचली आहे. सचिन तेंडुलकर यांनी त्यांचे चिरंजीव अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चंडोक यांच्या लग्नाचे अधिकृत निमंत्रण देण्यासाठी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. या हायप्रोफाईल भेटीमुळे आता क्रीडा आणि राजकीय वर्तुळात अर्जुनच्या लग्नाच्या तारखेबाबत आणि तयारीबाबत प्रचंड कुतूहल निर्माण झाले आहे.

**नई दिल्ली (एजेंसी)।** आरोपी अरशद खान को शहर की सीसीबी पुलिस ने एक ग्रेनेड बरामदगी मामले में गिरफ्तार किया था। गिरफ्तारी के बाद, मामला राष्ट्रीय जांच एजेंसी (एनआईए) को सौंप दिया गया था। हालांकि बाद में उसे जमानत मिल गई, लेकिन अरशद खान अदालत में पेश होना बंद कर दिया, जिसके चलते अदालत ने वारंट और उद्घोषणा जारी की। अदालत के आदेश पर कार्रवाई करते हुए, एनआईए ने अब उसे हिरासत में ले लिया है।

### दिल्ली में आतंकी हमलों को लेकर जारी किया गया है अलर्ट

गौरतलब है कि दिल्ली में आज ही आतंकी धमाकों को लेकर अलर्ट जारी किया गया है। खबर है कि दिल्ली में आतंकी, लाल किले के सामने धमाका कर सकते हैं। इसके अलावा चांदनी चौक के मंदिर को भी आतंकियों द्वारा निशाना बनाया जा सकता है।

मिली जानकारी के मुताबिक, आतंकी संगठन लश्कर ए तैयबा एक्टिव मोड में है और आईईडी हमले की साजिश रच रहा है। सुरक्षा एजेंसियों के सूत्रों के अनुसार ये खबर सामने आई है कि 6 फरवरी को पाकिस्तानी राजधानी इस्लामाबाद की एक मस्जिद में आत्मघाती विस्फोट हुआ था। लश्कर ए तैयबा के आतंकी इस विस्फोट का बदला लेना चाहते हैं। इस्लामाबाद में हुए विस्फोट में 31 लोग मारे गए थे और 160 से अधिक घायल हुए थे। इसकी जिम्मेदारी इस्लामिक स्टेट समूह ने ली थी। इसके बावजूद आतंकी भारत के मंदिरों को निशाना बनाना चाहते हैं। इससे पहले 10 नवंबर, 2025 को दिल्ली के ऐतिहासिक लाल किले के पास विस्फोट हो चुका है।

## कोर्ट में चल रहा था तलाक का केश, सड़क पर मिल गई पत्नी, पति ने बरसा दी गोलियां

**नई दिल्ली (एजेंसी)।** फरीदाबाद के पल्ला थाना क्षेत्र में शुक्रवार की रात एक 30 वर्षीय महिला को उसके पति ने सड़क के बीचों-बीच गोली मारकर हत्या कर दी। घटना के बाद आरोपी मौके से फरार हो गया। पल्ला पुलिस थाना में उसके खिलाफ हत्या का मामला दर्ज किया गया है।

### मृतका की पहचान

पुलिस के अनुसार, मृतका की पहचान संगीता देवी के रूप में हुई है। वह अपने दो बच्चों के साथ यहां सनलाइट कॉलोनी में रह रही थी और पति व ससुराल वालों से अलग रह रही थी। उसके पति के साथ उसका तलाक का मामला न्यायालय में लंबित था और वह कुछ पारिवारिक विवादों में भी उलझी हुई थी।

घटना शुक्रवार रात 8 बजे के करीब बसंतपुर गांव की सनलाइट कॉलोनी में हुई। स्थानीय लोगों ने बताया कि संगीता देवी घर से बाहर गई हुई थी और जब उसके पति व कुछ ससुराल वाले घर पहुंचे तो वह वहां नहीं मिली। घर में न मिलने पर वे लौटने लगे, लेकिन थोड़ी देर बाद सड़क पर संगीता को आते देख उन्होंने उसे रोक लिया। पुलिस के अनुसार, दोनों पक्षों के बीच विवाद हो गया। आरोप है कि पति के पास हथियार था। जब पति का गुस्सा बढ़ा, तो संगीता ने खुद को बचाने की कोशिश की और पीछे हट गई, लेकिन पति ने उस पर तीन राउंड फायर किए। संगीता को दो गोलियों के घाव लगे और वह सड़क पर गिर गई। गोली की आवाज सुनकर आसपास के लोग बाहर आए, जिसे देख आरोपी मौके से फरार हो गया।

सूचना मिलने के बाद मृतका के पिता भी घटनास्थल पर पहुंचे। पड़ोसियों की मदद से घायल संगीता को सेक्टर 31 के एक प्राइवेट अस्पताल ले जाया गया, जहां डॉक्टरों ने उसे मृत घोषित कर दिया। पुलिस ने शव को पोस्टमार्टम के लिए भेज दिया।

# साध्वी ऋतंभरा बीकानेर पहुंचीं, हिंदू समाज को संगठित रहने का दिया संदेश



### बोलीं- दुर्जनों से अधिक खतरा निष्क्रिय सज्जनों से

संवाददाता

**जयपुर।** राममंदिर आंदोलन की प्रमुख वक्ता और ओजस्वी संत साध्वी ऋतंभरा के बीकानेर आगमन से शहर में धार्मिक उत्साह का माहौल बन गया है। शनिवार सुबह वे नाल एयरपोर्ट पहुंचीं, जहां श्रद्धालुओं ने पुष्पवर्षा और जयघोष के साथ उनका भव्य स्वागत किया।

साध्वी ऋतंभरा 22 से 28 फरवरी तक पॉलिटेक्निक कॉलेज मैदान में आयोजित श्रीमद्भागवत कथा और 51 कुंडीय विश्व शांति महायज्ञ में कथा वाचन करेंगी। आयोजन को लेकर शहर में व्यापक तैयारियां की गई हैं और बड़ी संख्या में श्रद्धालुओं के जुटने की संभावना है।

### आत्मबल और साहस जागृत करने का आह्वान

पत्रकारों से बातचीत में साध्वी ऋतंभरा ने हिंदू समाज को संगठित और सजग रहने का संदेश दिया। उन्होंने कहा, 'दुर्जनों की दुष्टता से ज्यादा खतरा सज्जनों की निष्क्रियता से होता है।' उन्होंने समाज से आत्मबल और साहस जागृत करने का आह्वान करते हुए कहा कि सरकारें अपना दायित्व निभाती हैं, लेकिन समाज को भी अपनी शक्ति पहचाननी होगी।

### प्रतिमाएं तोड़ सकते हैं आस्था नहीं

इतिहास का उल्लेख करते हुए उन्होंने कहा कि युगों-युगों से मंदिरों और प्रतिमाओं पर आक्रमण होते रहे हैं, किंतु सनातन आस्था को कभी पराजित नहीं किया जा सका। उन्होंने दृढ़ स्वर में कहा कि 'प्रतिमाएं खंडित की जा सकती हैं, लेकिन आस्था को नहीं तोड़ा जा सकता'।

### निकाली गई भव्य कलश यात्रा

यह आयोजन सनातन धर्म रक्षा समिति के तत्वावधान में हो रहा है। 21 फरवरी को नगर सेठ लक्ष्मीनाथ मंदिर से भव्य कलश यात्रा निकाली गई, जिसमें साध्वी ऋतंभरा भी शामिल हुईं। उज्जैन का डमरू दल और पुणे से आई महिलाओं व युवतियों की टीम ने ढोल-नगाड़ों के साथ आकर्षक प्रस्तुतियां दीं।

### मानव कल्याण के लिए 1 लाख 65 हजार आहुतियां

आयोजन के तहत 51 कुंडीय विश्व शांति महायज्ञ भी संपन्न होगा। यज्ञाचार्य पंडित सिद्धार्थ पुरोहित (बाला महाराज) के निर्देशन में विश्व शांति और मानव कल्याण की कामना से 1 लाख 65 हजार आहुतियां दी जाएंगी।

आयोजन समिति के अनुसार, वर्तमान वैश्विक परिस्थितियों को देखते हुए यह महायज्ञ मानवता के कल्याण और विश्व शांति के उद्देश्य से किया जा रहा है। बीकानेर में अगले एक सप्ताह तक भक्ति, प्रवचन और आध्यात्मिक ऊर्जा का विशेष वातावरण बना रहेगा।

#### दिल्ली में आतंकी हमले का अलर्ट

## लाल किले की सुरक्षा बढ़ाई

### चांदनी चौक का मंदिर भी निशाने पर; धार्मिक-ऐतिहासिक जगहों की सिक्योरिटी बढ़ाई

**नई दिल्ली (एजेंसी)।** केंद्रीय खुफिया एजेंसियों से मिले इनपुट के बाद दिल्ली में सिक्योरिटी बढ़ाई गई है। लाल किले के आसपास आईईडी ब्लास्ट की आशंका को लेकर अलर्ट जारी किया है।

खुफिया जानकारी के अनुसार पाकिस्तान स्थित आतंकी संगठन लश्कर-ए-तैयबा ने भारत के प्रमुख धार्मिक स्थलों को अपने निशाने पर रखा है। सूत्रों के मुताबिक चांदनी चौक इलाके का मंदिर भी आतंकियों के टारगेट पर है। इसके चलते दिल्ली के प्रमुख धार्मिक और ऐतिहासिक स्थलों पर सुरक्षा बढ़ाई गई है। हालांकि इन सूचनाओं की अभी जांच की जा रही है, लेकिन एहतियात बरती जा रही है।

### सीसीटीवी निगरानी बढ़ाई गई

दिल्ली पुलिस और केंद्रीय एजेंसियां मिलकर स्थिति पर नजर रख रही हैं। संवेदनशील इलाकों में उउळश से निगरानी, वाहनों की जांच और अतिरिक्त सुरक्षाकर्मियों की तैनाती की गई है। साथ ही बम स्क्वॉड, डॉग स्क्वॉड और क्विक रिएक्शन टीमों को तैनात की गई हैं। सुरक्षा एजेंसियों ने लोगों से सतर्क रहने और किसी भी संदिग्ध वस्तु या गतिविधि की तुरंत पुलिस या आपात सेवाओं को सूचना देने की अपील की है। अधिकारियों ने कहा कि घबराने की जरूरत नहीं है, यह कदम केवल सावधानी के तौर पर उठाए गए हैं।यह अलर्ट 10 नवंबर 2025 को लाल किले के पास हुए एक कार बम धमाके के बाद आया है। उस धमाके में 13 लोगों की मौत हो गई थी और 20 से ज्यादा लोग घायल हुए थे।

# अमेरिका की मॉली एम्मा एटकिन को मिलेगा कर्नल जेम्स-टॉड सम्मान

## 35,000 फीट ऊंचाई पर आपातकालीन प्रसव कराने वाले क्रू सदस्यों को मिलेगा पन्नाधाय सम्मान

संवाददाता

**जयपुर।** महाराणा मेवाड़ चैरिटेबल फाउंडेशन के वर्ष 2026 के अंतरराष्ट्रीय एवं राष्ट्रीय अलंकरणों की घोषणा की गई है। ये सम्मान उन विशिष्ट व्यक्तित्वों को दिए जा रहे हैं, जिन्होंने अपने क्षेत्र में उत्कृष्ट योगदान देकर समाज, राष्ट्र और विश्व समुदाय को स्थायी मूल्य दिए हैं।

अलंकरण समारोह के संयोजक डॉ. मयंक गुप्ता ने बताया- फाउंडेशन के अध्यक्ष एवं प्रबंध न्यासी डॉ. लक्ष्यराज सिंह मेवाड़ की उपस्थिति में फाउंडेशन का 42वां अलंकरण समारोह 15 मार्च को सिटी पैलेस उदयपुर में आयोजित होगा। फाउंडेशन अब तक 41 वार्षिक समारोहों में देश-विदेश की 4,972 विभूतियों एवं मेधावी विद्यार्थियों को सम्मानित कर चुका है।

इस बार अंतरराष्ट्रीय स्तर का कर्नल जेम्स टॉड सम्मान अमेरिका की डॉ. मॉली एम्मा एटकिन को दिया जाएगा। वहीं वर्ष 2017 में 35 हजार फीट की ऊंचाई पर आपातकालीन प्रसव कराने वाले जेट एयरवेज की फ्लाइट 9डब्ल्यू 569 केक्रू सदस्यों को सामूहिक रूप से इस वर्ष का पन्नाधाय सम्मान दिया जाएगा।

**कर्नल जेम्स टॉड सम्मान:**

इस वर्ष अंतरराष्ट्रीय स्तर का कर्नल जेम्स टॉड सम्मान अमेरिका की डॉ. मॉली एम्मा एटकिन को दिया जाएगा। डॉ. एटकिन सिटी यूनिवर्सिटी ऑफ न्यूयॉर्क में कला इतिहास की एसोसिएट प्रोफेसर हैं। वे भारतीय लघुचित्र परंपरा, विशेषतः मेवाड़ एवं राजपूत दरबारी चित्रकला की अग्रणी विदुषी मानी जाती हैं। डॉ. एटकिन ने हार्वर्ड यूनिवर्सिटी एवं कोलम्बिया यूनिवर्सिटी से पढ़ाई की। भारत आकर राजस्थानी चित्रकला की परंपरा का अध्ययन किया। उनकी चर्चित कृति दी इंटलीजेन्स ऑफ ट्रेडिशन इन राजपूत कोर्ट पेंटिंग को अंतरराष्ट्रीय स्तर पर व्यापक सराहना मिली और प्रतिष्ठित पुरस्कारों से सम्मानित किया गया। मेवाड़ की चित्रकला, साहिबदीन और चोखा जैसे सिद्धहस्त कलाकारों पर उनके शोध ने वैश्विक स्तर पर मेवाड़ की सांस्कृतिक विरासत को नई पहचान दी है। कर्नल जेम्स टॉड अलंकरण के तहत दो लाख एक रुपए की राशि, तोरण, शॉल एवं प्रशस्ति पत्र भेंट किए जाएंगे।

### हल्दीघाटी सम्मान

इस वर्ष राष्ट्रीय स्तर का हल्दीघाटी सम्मान वरिष्ठ पत्रकार कमलेश किशोर सिंह को दिया जाएगा। डिजिटल पत्रकारिता में नवाचार, हिंदी पत्रकारिता को सशक्त दिशा प्रदान करने तथा नई पीढ़ी के पत्रकारों को मार्गदर्शन देने में उनका योगदान विशेष रूप से उल्लेखनीय है।

**महाराणा उदय सिंह सम्मान**

इस वर्ष पर्यावरण संरक्षण के क्षेत्र में विशिष्ट योगदान के लिए मरिमुथु योगनाथन को महाराणा उदय सिंह सम्मान से सम्मानित किया जाएगा, जिन्हें देशभर में ट्री मैन ऑफ इंडिया के नाम से जाना जाता है। कोयंबटूर में तमिलनाडु राज्य परिवहन निगम (टीएनएसटीसी) के बस परिचालक के पद पर कार्यरत रहते पर्यावरण आंदोलन और विकास के लिए आपकी यात्रा प्रेरणादायी है। इन्होंने पांच लाख से अधिक पौधे रोपे हैं, जिनमें से लगभग साढ़े तीन लाख वृक्ष आज भी जीवित हैं।

### पन्नाधाय सम्मान

निर्धारित दायित्व सीमा से ऊपर उठकर किए गए कार्य के लिए दिया जाने वाला इस वर्ष का पन्नाधाय सम्मान, वर्ष 2017 में 35,000 फीट की ऊंचाई पर आपातकालीन प्रसव को सफलतापूर्वक संपन्न कराने वाले जेट एयरवेज की फ्लाइट 9डब्ल्यू 569 के समर्पित क्रू सदस्यों को सामूहिक रूप से दिया जाएगा। जेट एयरवेज की इस उड़ान के दौरान सीमित संसाधनों, चिकित्सकीय सुविधाओं के अभाव और अत्यंत चुनौतीपूर्ण परिस्थितियों में क्रू ने अद्भुत संयम, साहस और मानवीय संवेदनशीलता का परिचय दिया।

## हादसे में 5 पुलिसकर्मियों की मौत, 3 घायल

**झारसुगुड़ा, (ए.)।** ओडिशा के झारसुगुड़ा में ट्रेलर और पुलिस गाड़ी की टक्कर हो गई। घटना में 5 पुलिसकर्मियों की मौत हो गई। 3 पुलिसकर्मी गंभीर घायल हैं। उनका इलाज जारी है। हादसा रविवार सुबह 4 बजे झारसुगुड़ा सदर पुलिस स्टेशन के पास हुआ। पुलिसकर्मी गश्त पर निकले थे, इसी दौरान सामने से आ रहे तेज रफ्तार ट्रेलर से उनकी गाड़ी टकरा गई। टक्कर इतनी जोरदार थी कि पुलिस बोलेरो गाड़ी पूरी तरह से क्षतिग्रस्त हो गई। इसके कारण घायल पुलिसकर्मी उसी में फंस गए थे। पुलिस और स्थानीय लोगों ने घायलों को बाहर निकाला था। पुलिस ने बताया है कि जिनकी मौत हुई है, उनमें सशस्त्र पुलिस बल रिजर्व कॉन्स्टेबल काशीराम भोई, देबदत्त सा, ड्रिल स्ढ्ढ निरंजन कुजूर, हवलदार लिंगराज धुरुआ और होमगार्ड जवान भक्तबंधु मिर्धा शामिल हैं। घायलों में दुबराज मिरिग, आकाश नायक और राजीव भारसागर का नाम है। तीनों का झारसुगुड़ा जिला अस्पताल में इलाज जारी है, लेकिन उनकी हालत गंभीर बनी हुई है। झारसुगुड़ा एसपी गुंडाला राघवेंद्र के मुताबिक ट्रेलर ड्राइवर हिरासत में है। उससे पूछताछ की जा रही है। मामले की जांच जारी है।

## दबंगों ने दलित परिवार का छप्पर फूंका

**कानपुर, (ए.)।** कानपुर में दबंगों ने दलित परिवार के घर के बाहर छप्पर में आग लगा दी। खौफ पैदा करने के लिए चार राउंड हवाई फायरिंग की। दरअसल, ट्रैक्टर निकालने के दौरान छप्पर टूट गया। इस पर दलित परिवार ने आपत्ति की। आरोप है कि कहासुनी के बाद दबंगों ने लाठी-डंडों से मारपीट की और फिर छप्पर में आग लगा दी। घटना कानपुर के सजेती थाना क्षेत्र के मढ़ापुर गांव की है। इस मारपीट में एक ही परिवार के पांच लोग घायल हुए हैं, जबकि बीच-बचाव करने पहुंचे दो पड़ोसी भी चोटिल हुए। जानकारी मिलने के बाद विधायक सरोज कुरील ने अस्साल पहुंचकर घायलों का हालचाल जाना। उन्होंने पुलिस अधिकारियों को आरोपियों के खिलाफ कार्रवाई के निर्देश दिए।

## भारतीय तटरक्षक बल की बड़ी कार्रवाई: अरब सागर में 5 करोड़ की विदेशी सिगरेट जब्त, 4 ईरानी गिरफ्तार

**अहमदाबाद, (ए.)।** अरब सागर में घुसपैठ और तस्करी के खिलाफ बड़ी सफलता हासिल करते हुए भारतीय तटरक्षक बल ने एक विशेष अभियान के दौरान विदेशी ब्रांड की सिगरेट से भरी संदिग्ध नाव को पकड़ा है। इस कार्रवाई में 4 ईरानी नागरिकों को गिरफ्तार किया गया है।

प्राप्त जानकारी के अनुसार, देवभूमि द्वारका से करीब 115 किलोमीटर दूर भारतीय समुद्री सीमा के फॉरवर्ड एरिया में नियमित गश्त के दौरान तटरक्षक बल की टीम को एक संदिग्ध नाव दिखाई दी। शक होने पर जब नाव को रोका गया और तलाशी ली गई तो पता चला कि अल मुख्तार नाम की यह नाव विदेशी सामान की तस्करी में लिप्त थी। जांच के दौरान नाव से विदेशी ब्रांड की सिगरेट के करीब 200 बड़े कार्टन बरामद किए गए। अंतरराष्ट्रीय बाजार में इस खेप की अनुमानित कीमत लगभग 5 करोड़ रुपये बताई जा रही है।

कार्रवाई के दौरान नाव पर सवार 4 ईरानी नागरिकों को हिरासत में लिया गया। उनके पास से प्रतिबंधित थुराया सैटेलाइट फोन और 8 मोबाइल फोन भी जब्त किए गए हैं। गिरफ्तार किए गए सभी ईरानी नागरिकों और जब्त नाव को आगे की जांच के लिए पोरबंदर जेट्टी लाया गया है। सुरक्षा एजेंसियां अब इस तस्करी के पीछे सक्रिय बड़े नेटवर्क की जांच में जुट गई हैं। साथ ही यह भी पता लगाया जा रहा है कि सिगरेट की यह खेप गुजरात या किसी अन्य राज्य के तट पर उतारने की योजना थी।

## एएसआई और होमगार्ड की गोली मारकर हत्या

**- पुलिस आतंकी-गैंगस्टर एंगल से कर रही जांच**

**गुरदासपुर, (ए.)।** पंजाब के गुरदासपुर जिले में देर रात एक पुलिस चौकी पर तैनात दो पुलिसकर्मियों की गोली लगने से मौत हो गई। यह घटना सरहदी कस्बे दोरांगला थाना क्षेत्र के गांव आदिया में रात करीब 1 बजे हुई। फिलहाल यह स्पष्ट नहीं हो पाया है कि गोली किसने चलाई। सूत्रों के मुताबिक, दोनों पुलिसकर्मियों के सर्विस वेपन बरामद कर लिए गए हैं।

वरिष्ठ खुफिया अधिकारियों ने बताया कि जांच टीम मृतकों के मोबाइल फोन की भी पड़ताल कर रही है, ताकि घटना से जुड़े अहम सुराग मिल सकें। मृतक पुलिसकर्मियों की पहचान होमगार्ड अशोक कुमार और पंजाब पुलिस के एएसआई गुरनाम सिंह के रूप में हुई है। दोनों के शवों को पोस्टमार्टम के लिए सिविल अस्पताल गुरदासपुर भेज दिया गया है। घटना की सूचना मिलते ही गुरदासपुर के एसएसपी आदित्य शर्मा मौके पर पहुंचे। उनके साथ फॉरेंसिक टीमों ने भी घटनास्थल का मुआयना किया। इसके अलावा बीएसएफ के डीआईजी जेके विरदी भी मौके पर पहुंचे। एसएसपी ने बताया कि दोनों जवान चौकी के कमरे में मृत अवस्था में पाए गए। पुलिस मामले की अलग-अलग एंगल से जांच कर रही है।

## शीर्ष नक्सली देवजी ने किया आत्मसमर्पण

**तेलंगाना पुलिस के सामने डाले हथियार!**

**सुकमा, (ए.)।** नक्सली संगठन के महासचिव टिप्पिरी तिरुपति उर्फ देवजी ने तेलंगाना पुलिस के सामने आत्मसमर्पण की खबर है। बताया जा रहा है कि देवजी ने अपने साथी सीसीएम संग्राम के साथ पुलिस के सामने हथियार डाले दिए हैं। सूत्रों से यह जानकारी मिली है। हालांकि, पुलिस ने अभी तक इसकी अधिकारिक पुष्टि नहीं की है। कुछ महीने पहले ही देवजी को संगठन का महासचिव बनाया गया था। इससे पहले पूर्व महासचिव नम्बाला केशव राव उर्फ बसवराजू पिछले साल मई को छत्तीसगढ़ में सुरक्षा बलों की कार्रवाई में मारा गया था। अगर देवजी के आत्मसमर्पण की आधिकारिक पुष्टि होती है, तो एक वर्ष के भीतर दूसरी बार संगठन शीर्ष नेतृत्व विहीन हो जाएगा।

वहीं, सूत्रों का कहना है कि देवजी के साथ कई सशस्त्र कैडरों के भी आत्मसमर्पण करने की बात भी संभावना है। इससे पूर्व 19 नवंबर 2025 में एक करोड रुपए से ज्यादा के इनामी खूंखार नक्सली माडवी हिड़मा को मारने के बाद नक्सलियों के टॉप लीडर देवजी को भी ढेर करने की खबर सामने आई थी। हालांकि आधिकारिक तौर पर पुष्टि नहीं हुई थी। छत्तीसगढ़-आंध्रप्रदेश बॉर्डर पर मारेडुमिल्ली के जंगलों में हुई मुठभेड़ में पोलित ब्यूरो मेंबर और नक्सल महासचिव देवजी समेत कुल सात नक्सली मारे आने की खबर सामने आई थी।

# एसआयआरनंतर ९ राज्यांत १.७ कोटी मतदारांची घट

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

देशातील सहा राज्ये आणि काही केंद्रशासित प्रदेशांमधील मतदार यादींचे विशेष सघन पुनरावृत्ती पूर्ण झाले आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या प्रक्रियेदरम्यान नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील मतदारांची संख्या १७ लक्षांहून कमी झाली आहे. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, एसआयआर सुरू होण्यापूर्वी गुजरात, पुडुचेरी, लक्षद्वीप, राजस्थान, छत्तीसगड, अंदमान आणि निकोबार बेटे, गोवा आणि केरळ या नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारांची संख्या अंदाजे २१४.५ दशलक्ष होती.

अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर, ही संख्या अंदाजे १९७.५ दशलक्ष झाली, म्हणजेच एकूण १७ दशलक्ष मतदारांची घट झाली. गुजरातमध्ये सर्वाधिक नावे वगळण्यात आली. यादीतून एकूण ६८ लाख १२ हजार मतदार वगळण्यात आले, ज्यामुळे एकूण मतदार संख्या अंदाजे ५०.८ दशलक्ष वरून ४४ दशलक्ष झाली, जी अंदाजे १३.४०% कमी झाली. त्यानंतर मध्य प्रदेशचा क्रमांक लागतो, जिथे अंदाजे ३.४२५ दशलक्ष नावे वगळण्यात आली, ज्यामुळे मतदारांची संख्या ५७.४ दशलक्ष वरून ५३.९ दशलक्ष झाली. राजस्थानमध्ये ३.१ दशलक्ष मतदार वगळण्यात आले, तर छत्तीसगडमध्ये २.५ दशलक्ष मतदार वगळण्यात आले. इतर राज्यांमध्येही लक्षणीय घट राजस्थानमध्ये ३.१३६ दशलक्ष मतदारांची नावे वगळण्यात आली. निवडणूक आयोगाच्या मते, मतदार यादीतून वगळण्याची मुख्य कारणे म्हणजे मृत्यू, कायमचे स्थलांतर अनेक नोंदणी किंवा इतर पात्रता समस्या. आयोगाने सांगितले की मतदार यादी अद्ययावत करणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि पात्र नागरिक अजूनही जोडणी, वगळणे किंवा दुरुस्त्यांसाठी अर्ज करू शकतात.

देशाच्या अनेक भागात निवडणूक आयोगाची विशेष पुनरावृत्ती मोहीम सुरू आहे. बिहारमध्ये ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर सध्या १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये ही प्रक्रिया सुरू आहे, ज्यामध्ये अंदाजे ६०० दशलक्ष मतदार सहभागी होतील. पुढील टप्प्यात १७ राज्ये आणि पाच केंद्रशासित प्रदेशांमधील अंदाजे ४०० दशलक्ष मतदार सहभागी होतील.

# नाशिक महापालिका ‘स्थायी’ सभापतीपदी मच्छिंद्र सानप

## उपमहापौर पदाच्या निवडणुकीत ऐनवेळी माघार घेतल्याची बक्षिसी

**नाशिक, प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदाच्या निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला असतानाच भाजपचा उमेदवार कोण? याबाबतचा सस्पेन्स अखेर सोमवारी दुपारी संपला. उपमहापौर पदाच्या निवडणुकीत ऐनवेळी माघार घ्याव्या लागलेल्या मच्छिंद्र सानप यांचे नाव या पदासाठी जाहीर करण्यात आले आहे. सभापती पदाबाबत कुंभ मंत्री गिरीश महाजन हे अंतिम निर्णय घेणार हे निश्चित असल्याने ते कोणत्या नावाला पसंती देतात, याकडे लक्ष लागून राहिले होते. स्थायी समिती सभापतीपदाची निवडणूक २५ फेब्रुवारीला होणार आहे. उपमहापौर पदाच्या निवडणुकीत ऐनवेळी माघार घ्याव्या लागलेल्या मच्छिंद्र सानप यांचे नाव



या पदासाठी होतेच हे यानिमित्ताने स्पष्ट झाले.

उमेदवारी अर्ज भरण्याचा सोमवारी शेवटचा दिवस असताना पक्षाकडून कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होते, याबाबत उत्कंठा

### बुधवारी होणार अधिकृत शिक्कामोर्तब

शिगेला पोहोचली होती. स्थायी समिती सभापतीपदाची निवडणूक येत्या बुधवारी अर्थात २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. समितीत भाजपचे सर्वाधिक ९ सदस्य असल्याने सभापतिपद याच पक्षाकडे राहणार हे स्पष्ट होते. त्यानंतर सर्वाधिक ४ सदस्य असलेल्या शिवसेना तसेच एकमेव सदस्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचा भाजपला पाठींबा आहे. विरोधात केवळ शिवसेना (उबाठा ) चे दोन सदस्य आहेत.

**भाजपकडून ही नावे होती चर्चेत**

महापालिकेच्या अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या स्थायी समिती सभापतीपदासाठी भाजपकडून अनेक नावांची चर्चा सुरू होती. पक्षाचे प्रभारी तथा कुंभ मंत्री गिरीश महाजन हे याबाबत अंतिम निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट होते. माजी आमदार बाळासाहेब सानप यांचे पुत्र मच्छिंद्र सानप, डॉ. दिपाली कुलकर्णी आणि माधुरी बोलकर यांची नावे त्यासाठी सर्वाधिक चर्चेत होती. उपमहापौर निवडणुकीवेळी भाजपने ऐनवेळी शिवसेनेसह युती केल्याने सानप यांना उमेदवारी मागे घ्यावी लागली होती. त्याचा परतावा म्हणून आता त्यांना स्थायी समिती सभापतीपदाची संधी दिली जाऊ शकते, अशी राजकीय वर्तुळात सुरू असलेली चर्चा वास्तवात खरी ठरली. याशिवाय महापौर पदाच्या शर्यतीत शेवटपर्यंत राहिलेल्या दीपाली कुलकर्णी आणि माधुरी बोलकर यांनीही सभापतीपदासाठी लॉबिंग केल्याची माहिती आहे. मात्र अखेर ही नावे बाजूला पडून मच्छिंद्र सानप यांच्या नावावर प्रदेश भाजपने शिक्कामोर्तब केले.

**सभापती भाजप महायुतीचाच होणार**

भाजप महायुतीने स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीत मच्छिंद्र सानप यांना उमेदवारी दिली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसने महापौरपदाच्या निवडणुकीपूर्वीच भाजपला बिनशर्त पाठींबा जाहीर केला आहे.त्यामुळे १६ सदस्यांपैकी भाजप ९, शिवसेना ४, राष्ट्रवादी १ असे १४ सदस्य महायुतीच्या उमेदवाराकडे आहे.स्थायी समिती सभापती भाजप महायुतीचाच होणार हे निश्चित आहे.

**सुनील केदार**
**अध्यक्ष, भाजप नाशिक महानगर जिल्हा.**

# माजी रेल्वेमंत्री मुकुल रॉय यांचे निधन

**कोलकाता, वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालचे ज्येष्ठ नेते आणि माजी रेल्वेमंत्री मुकुल रॉय यांचे निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते कोलकात्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत होते, जिथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या कुटुंबाने त्यांच्या निधनाची घोषणा केली. मुकुल रॉय यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात धक्का बसला आहे. मुकुल रॉय हे बंगालमधील राजकारणाचे चाणक्य म्हणून ओळखले जात होते. त्यांनी डाव्या गटातून राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती, परंतु डाव्या गटात त्यांचा वास्तव्य अल्पकाळ टिकला. त्यांना उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील काँग्रेसच्या नेत्या मृणाल सिंगराय यांनी पक्षात आणले. मुकुल यांनी विद्यार्थी परिषदेत सामील होऊन काँग्रेसचा प्रवास सुरू केला. तेव्हापासून ते ममता बॅनर्जी यांच्या जवळचे होते.



टीएमसीच्या संस्थापक सदस्या ममता बॅनर्जी यांनी १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात एक नवीन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला. तत्कालीन विरोधी पक्षनेत्या ममता यांनी मुकुल आणि काही इतरांसह एक नवीन पक्ष स्थापन करण्याची योजना आखली. मुकुल, अतिन घोष आणि तमोनाश घोष यांच्यासह नऊ नेत्यांनी तृणमूल काँग्रेस हा नवीन पक्ष स्थापन करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज केला. ममता बॅनर्जी त्यावेळी अधिकृतपणे तृणमूल काँग्रेसच्या सदस्य झाल्या नव्हत्या. नंतर त्या सदस्य झाल्या.

# राष्ट्रपती भवनात सी. राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचे अनावरण




**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात भारताचे पहिले आणि एकमेव भारतीय गव्हर्नर-जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. हा पुतळा यापूर्वी असलेल्या एडविन लुटियन्स यांच्या पुतळ्याच्या जागी स्थापित करण्यात आला आहे. गुलामगिरीची मानसिकता मागे सोडून भारतीय नायकांना सन्मान देण्याच्या प्रतीकात्मक पावलाचा हा भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती तसेच अनेक केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

सोमवारी राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित ‘राजाजी उत्सव’ कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचे अनावरण केले.

राष्ट्रपतींनी सोशल मीडिया व्यासपीठ ‘एक्स’वर माहिती देताना सांगितले की, हा पुतळा अशोक मंडपाजवळील भव्य पायऱ्यांवर उभारण्यात आला आहे. याच ठिकाणी पूर्वी एडविन लुटियन्स यांचा पुतळा होता. गुलामगिरीच्या विचारसरणीपासून मुक्त होण्याचा आणि भारताची संस्कृती, परंपरा व वारसा अभिमानाने स्वीकारण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, भारतमातेची असामान्य योगदानातून सेवा करणाऱ्या महान व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्याचाही हा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशाच्या इतिहास घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या भारतीय नेत्यांना योग्य ओळख देण्याच्या राष्ट्रीय प्रयत्नांचे हे प्रतीक असल्याचे राष्ट्रपतींनी अधोरेखित केले. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना ‘राजाजी’ या नावाने ओळखले जाते. ते प्रख्यात स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी आणि विद्वान होते. १९४८ ते १९५० या कालावधीत त्यांनी भारताचे शेवटचे गव्हर्नर-जनरल म्हणून कार्यभार सांभाळला होता.

# अमेरिका-इराण तणाव वाढला

## भारतीय नागरिकांना तातडीने देश सोडण्याचा सल्ला

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तेहरानमधील भारतीय दूतावासाने २३ फेब्रुवारी रोजी महत्त्वाची सूचना जारी केली आहे. या सूचनेत इराणमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांना(विद्यार्थी, तीर्थयात्री, व्यापारी आणि पर्यटक) उपलब्ध सर्व साधनांचा, विशेषतः व्यावसायिक विमानसेवेचा वापर करून तातडीने इराण सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दूतावासाने स्पष्ट केले आहे की, ५ जानेवारी रोजी भारत सरकारने जारी केलेल्या सल्ल्याच्या पुढील टप्प्यात आणि इराणमधील बदलत्या सुरक्षास्थितीच्या पार्श्वभूमीवर, इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी उपलब्ध वाहतुकीच्या साधनांचा वापर करून देश सोडावा.

याआधी १४ जानेवारी रोजी जारी करण्यात आलेल्या सूचनेची आठवण करून देत दूतावासाने नागरिकांना अत्यंत सावध राहण्याचे, कोणत्याही प्रकारच्या आंदोलनांपासून दूर राहण्याचे, दूतावासाच्या सतत संपर्कात राहण्याचे आणि प्रवास व ओळखपत्रे (पासपोर्ट, व्हिसा आदी) नेहमी तयार ठेवण्याचे आवाहन केले होते.

दूतावासाने सांगितले आहे की, ज्या भारतीय नागरिकांनी अद्याप दूतावासात नोंदणी केलेली नाही, त्यांनी अधिकृत लिंकद्वारे तात्काळ नोंदणी करावी. इराणमध्ये इंटरनेट अडचणींमुळे नागरिकांना स्वतः नोंदणी करता येत नसेल, तर भारतामधील त्यांच्या कुटुंबीयांनी ही प्रक्रिया पूर्ण करावी.

ही सूचना अशा वेळी जारी करण्यात आली आहे, जेव्हा इराणच्या अणु कार्यक्रमावरून अमेरिका आणि इराणमधील तणाव टोकाला पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला १० ते १५ दिवसांत नवीन अणु करारासाठी तयार होण्याचा अल्टीमेटम दिला असून, अपयश आल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही दिला आहे.

दरम्यान, अमेरिकेने मध्य पूर्वेत मोठ्या प्रमाणावर लष्करी तैनाती केली असून युद्धनौका, लढाऊ विमाने, इतर सैन्य संसाधने तैनात करण्यात आली आहेत. इराणमध्ये सध्या विरोधी आंदोलने, झडपा-झडपी आणि अस्थिरतेचे वातावरण वाढत आहे. सुरक्षा परिस्थिती नाजूक बनली असून, अमेरिकेच्या संभाव्य लष्करी कारवाईमुळे संपूर्ण प्रदेशात युद्धाचा धोका निर्माण झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# लाल किल्ला आणि मंदिरे दहशतवाद्यांच्या निशाण्यावर? पाकिस्तान-बांगलादेशशी संबंधित ८ संशयितांना अटक

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ला आणि प्रमुख मंदिरांना लक्ष्य करण्याच्या दहशतवादी कटाचा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिल्यानंतर, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधून आठ संशयितांना अटक करण्यात आली आहे. या संशयितांचे पाकिस्तानची गुप्तचर संस्था ISI आणि बांगलादेशातील कट्टरपंथी गटांशी संबंध असल्याचा आरोप आहे. दरम्यान, सुरक्षा यंत्रणांनी राजधानीत हाय अलर्ट जारी केला आहे.

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्यांपैकी सहा जणांना तामिळनाडूतील उथुकुली, पल्लाडम आणि थिरुमुरुगनपुंडी या भागांतून ताब्यात घेण्यात आले, तर इतर दोघांना पश्चिम बंगालमधून पकडण्यात आले. 'एएनआय' या वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, अटक करण्यात आलेल्यांपैकी काही जण बांगलादेशी नागरिक असण्याची शक्यता आहे. या सर्वांना पुढील चौकशीसाठी दिल्लीला नेण्यात येत आहे.

देशभर घातपाती कारवाया करण्याची योजना आखणाऱ्या एका मॉड्यूलबाबत गुप्तचर संस्थांकडून माहिती मिळाल्यानंतर ही मोहीम राबवण्यात आली. पोलीस सूत्रांनी सांगितले की, "डझनभर मोबाईल फोन आणि सिम कार्ड जप्त करण्यात आले आहेत." या डिजिटल साहित्याचे विश्लेषण करून त्यांचे जाळे आणि परदेशी हँडलर्सचा शोध घेतला जात आहे. हा गट सोशल मीडियाद्वारे संपर्कात होता आणि त्यांनी कथितपणे पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांच्या समर्थनार्थ पोस्ट केल्या होत्या. यातील चार आरोपी एका आंतरराष्ट्रीय परिषदेदरम्यान दिल्लीत आले होते, जिथे त्यांनी मेट्रो स्टेशनवर 'फ्री काश्मीर'चे पोस्टर्स लावले होते आणि त्यानंतर ते पुन्हा तामिळनाडू व पश्चिम बंगालला परतले.

तपासादरम्यान, केवळ तामिळनाडूतील ठिकाणांहून ८ मोबाईल फोन आणि १६ सिम कार्ड जप्त करण्यात आले. संशयित आरोपी आपली ओळख लपवण्यासाठी बनावट आधार कार्डांचा वापर करत होते आणि गारमेंट उद्योगात काम करत होते.

# संतापाची लाट : प्रसाधनगृहांबाहेर छत्रपती शिवराय आणि महाराणी पद्मिनी यांचे फोटो

**सिक्री, वृत्तसंस्था**

हरियाणातून एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. सिक्री येथील एका बँक्वेट हॉलमधील प्रसाधनगृहांबाहेर दिशादर्शक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी पद्मिनी यांचा फोटो लावण्यात आला आहे. पुरुष आणि महिला प्रसाधनगृहांबाहेर फोटो लावण्यात आल्याने सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. याबाबत एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, नागरिक आणि इतिहासप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, हरियाणातील सिक्री परिसरात असलेल्या मिलान बँक्वेट हॉलमधून हा संतापजनक प्रकार समोर आला आहे. हॉलमधील प्रसाधनगृहांच्या फलकावर छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी पद्मिनी यांचा फोटो लावण्यात आला आहे. याप्रकरणी व्हिडिओ समोर आल्यानंतर सर्वांनी संताप व्यक्त केला.




सोशल मीडियावर याप्रकरणी तीव्र संताप व्यक्त करण्यात आल्यानंतर मिलान बँक्वेट हॉलच्या प्रसाधनगृहांबाहेर लावलेला छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी पद्मिनी यांचा फोटो हटविण्यात आल्याची माहिती आहे. याठिकाणी आता दुसरा फोटो लावण्यात आला आहे. दरम्यान, याप्रकरणी बँक्वेट हॉलच्या चालकांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

या घटनेचा आमदार जितेंद्र आव्हाड तसेच, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी निषेध व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार पक्ष) आमदार जितेंद्र आव्हाड यांना याबाबत प्रश्न विचारला असता याप्रकरणी नाराजी व्यक्त करत निषेध केला. ‘महाराज त्यांना माफ करो’, असे आव्हाड म्हणाले. रामदास आठवले यांनी देखील याप्रकरणी दोन्ही फोटो हटवून बँक्वेट हॉलच्या मालकांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. कारवाई न झाल्यास आरपीआयचे कार्यकर्ते ते काम करतील, असा इशाराही आठवले यांनी दिला.

बँक्वेट हॉलच्या प्रसाधनगृहांच्या बाहेर लावलेले छायाचित्राचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि इतिहासप्रेमींकडून तीव्र नाराजी व्यक्त करत कारवाईची मागणी केली. राजकीय स्तरातून देखील निषेध व्यक्त करण्यात आल्यानंतर बँक्वेट हॉलच्या व्यवस्थापनाला जाग आली आणि अखेर दोन्ही छायाचित्र हटविण्यात आली आहेत.

# अवकाळी पावसाचा तडाखा; महागाव तालुक्यात गहू पिकाचे मोठे नुकसान

**यवतमाळ, प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुका येथे अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे गहू पिकाला मोठा फटका बसला आहे. रात्रीच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसासह वादळी वाऱ्यामुळे शिवारातील पिके आडवी पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महागाव तालुक्यातील कोंदरी व वाकण परिसरात गहू पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक धोक्यात आले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पिके जमिनीवर लोळल्याने उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अचानक झालेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत सापडले असून पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

# मुंबई पालिकेच्या पहिल्या सभेत नामांतराचे २० प्रस्ताव

**मुंबई, प्रतिनिधी**

चार वर्षांनंतर होणाऱ्या मुंबई महापालिकेच्या पहिल्या महासभेत शहरातील खड्डे, कॉंक्रिटीकरण, अतिक्रमणे, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य मिळेल, अशी मुंबईकरांची अपेक्षा आहे. मात्र, 25 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या बैठकीच्या अजेंड्यावर रस्ते, पूल, चौक आणि सार्वजनिक ठिकाणांच्या नामकरण-नामांतराचे तब्बल 27 पैकी 20 प्रस्ताव अग्रक्रमावर असल्याने ‘विकासकामं नंतर, आधी नामांतर?’ असा सवाल उपस्थित होत आहे.

सभेत उर्वरित प्रस्तावांमध्ये तीन प्रस्ताव विविध समित्यांवरील सदस्य नियुक्तीबाबत असून, एक प्रस्ताव पदपथावरील गटई कामगारांना स्टॉल देण्यासंदर्भात आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांवरील ठोस निर्णयांपेक्षा नामांतराच्या राजकारणालाच अधिक महत्त्व दिले जात असल्याची चर्चा रंगली आहे.

**प्रमुख नामांतर प्रस्ताव**

वरळी जलतरण तलावाचे नाव ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जलतरण तलाव’ असे करण्याचा प्रस्ताव.

घाटकोपर-मानखुर्द रस्त्यावरील पुलाला ‘छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपूल’ हे नाव देण्याचा प्रस्ताव.

काळा घोडा येथील चौकाचे नामांतर ‘सायमन पेरेस चौक’ असे करण्याचा प्रस्ताव.

अंधेरी (पश्चिम) येथील एका रस्त्यास ‘संगीतकार बप्पी लाहिरी मार्ग’ असे नाव देण्याचा प्रस्ताव

मालाड (पश्चिम) येथील जलतरण तलावाचे नामांतर ‘भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जलतरण तलाव’ असे करण्याचा प्रस्ताव.

पवई जंक्शनला ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक’ असे नाव देण्याचा प्रस्ताव.

याशिवाय लालबाग येथील बॉम्बे गॅस लेन मैदान, मुलुंडमधील झुलेलाल मंदिराजवळील चौक, चेंबूरमधील सांडू गार्डनजवळील रस्ता, परळ व कुर्ला येथील चौक अशा अनेक ठिकाणांच्या नामांतराचे प्रस्ताव सभागृहात मांडले जाणार आहेत.

पूर्वी शिवसेना-भाजप सत्ताकाळात एका रस्त्यास Tipu Sultan यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्या प्रस्तावाला भाजपकडून पाठिंबा



मिळाल्याची आठवण करून देत विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना घेरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, 25 फेब्रुवारीच्या बैठकीत हा प्रस्ताव चर्चेसाठी नसल्याचे समजते.

# सर्वोच्च नक्षली नेता देवजीचे पोलिसांसमोर आत्मसमर्पण

**गडचिरोली, प्रतिनिधी**

देशातील नक्षलवादी चळवळीची धुरा सांभाळणाऱ्या सीपीआय (माओवादी) या प्रतिबंधित संघटनेचा सरचिटणीस थीप्पिरी तिरुपती ऊर्फ ‘देवजी’ याने तेलंगणा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याची माहिती समोर येत आहे.

६२ वर्षीय देवजीने तेलंगणातील मुलुगू जिल्ह्यात शस्त्रांसह शरणागती पत्करल्याचे समजते. तेलंगणा पोलिसांनी अद्याप या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला नसला तरी, गुप्तचर विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एक ते दोन दिवसात ही घोषणा होऊ शकते.

मूळचा करीमनगरचा रहिवासी असलेल्या देवजीवर महाराष्ट्र, तेलंगणासह विविध राज्यात एकूण दहा कोटींचे बक्षीस होते. अवघ्या आठ महिन्यांपूर्वीच त्याची संघटनेच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली होती. मे २०२५ मध्ये सुरक्षा दलांनी तत्कालीन सर्वोच्च नेता नंबाला केशव राव ऊर्फ बसवराजू याला एका चकमकीत ठार केल्यानंतर देवजीकडे संघटनेची सूत्रे आली होती. देवजीच्या आत्मसमर्पणावर शिक्कामोर्तब झाल्यास, एका वर्षाच्या आत दुसऱ्यांदा ही संघटना नेतृत्वहीन होणार आहे. केवळ देवजीच नव्हे, तर त्याच्यासोबत १५ ते २० सशस्त्र सदस्यांनी शरणागती पत्करल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्याविरुद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**प्रयागराज, वृत्तसंस्था**

अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणप्रकरणी शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. प्रयागराजमधील झुंसी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरमध्ये शंकराचार्यांचे शिष्य मुकुंदनंद यांचेही नाव आहे. झुंसी पोलिस ठाण्याचे प्रभारी महेश मिश्रा यांच्या मते, दोन-तीन अज्ञात व्यक्तींविरुद्धही पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जगद्गुरू रामभद्राचार्य यांचे शिष्य आशुतोष ब्रह्मचारी महाराज यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर प्रयागराज पोक्सो न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले. आशुतोष ब्रह्मचारी यांनी दोन मुलांना न्यायालयात हजर केले आणि गंभीर आरोप केले. मुलांचे जबाब कॅमेऱ्यासमोर नोंदवण्यात आले. न्यायालयाने १३ फेब्रुवारीपर्यंत आपला आदेश राखून ठेवला. तक्रारदार आशुतोष ब्रह्मचारी म्हणाले, "आम्ही घरोघरी फिरत होतो. आम्ही पोलिसांकडे जात होतो. आमचा खटला ऐकला जात नव्हता. म्हणूनच आम्ही न्यायाच्या मंदिरात आलो. आज आम्हाला वाटते की न्याय अजूनही जिवंत आहे. न्यायालयाने आज आम्हाला न्याय दिला." मी आता स्पष्टपणे सांगू इच्छितो की शिष्यांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले आणि त्यांना समलैंगिक कृत्ये करण्यास भाग पाडण्यात आले. न्यायालयाने याची पुष्टी केली आहे.

# इंडिया आघाडीचे नेतृत्व राहुल गांधींनी सोडावे- अय्यर

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

राहुल गांधी यांनी इंडिया आघाडीचं नेतृत्व सोडावं अशी सूचना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी केली आहे. त्यांच्या या सूचनेमुळं एकच खळबळ उडाली असून आपल्या या सूचनेमागचं कारणंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. त्याचबरोबर राहुल गांधींनी आपल्यावरील ही जबाबदार इतर कोणाकडं सोपवावी हे देखील अय्यर यांनी सांगितलं आहे.

मणिशंकर अय्यर म्हणाले, "ममतादीदींच्या शिवाय इंडिया आघाडीतील आय आणि एन तसंच डी आणि आय हे सगळं निघून जाईल. त्यामुळं मला आशा आहे की राहुल गांधी यांनी इंडिया आघाडीच्या अध्यक्षपदावर कायम राहण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा या आघाडीचं नेतृत्व त्यांनी प्रादेशिक छोट्या पक्षांचे जे अध्यक्ष आहेत त्यांच्यावर सोपवावं. यामध्ये डीएमकेचे प्रमुख स्टॅलिन असतील, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी असतील किंवा समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव अथवा राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव असतील यांच्यापैकी कोणाकडंही सोपवावं"

दरम्यान, मणिशंकर अय्यर यांच्या या विधानावर काँग्रेसनं सडकून टीका केली आहे. मणिशंकर अय्यर हे भानावर नाहीत. जर ते भानावर असते तर त्यांनी राहुल गांधींनी इंडिया आघाडीचं नेतृत्व सोडून दुसऱ्या काँग्रेसच्या व्यक्तीकडं ते सोपवावं अशी मागणी केली असती. त्यामुळं खरंतर ते काँग्रेसी आहेत असं तरी कसं म्हणावं? कारण राहुल गांधींच्या तुलनेत बाकीच्या प्रादेशिक पक्षाचे नेते तुलना योग्य नाहीत. कारण राहुल गांधी सध्या संसदेत पक्षाच्या ९९ खासदारांसह उभे आहेत. बाकीच्या पक्षांचे किती खासदार आहेत? ममतादीदी गोव्यात निवडणूक लढायला गेल्या पण त्यांच्या तृणमूल काँग्रेसची काय हालत झाली आपण सर्वांनी पाहिलं आहे. राहुल गांधींशिवाय इथं इतर कोणीही इतक्या तकदीनं भाजपविरोधात उभं राहू शकत नाही, असं एका काँग्रेस प्रवक्त्यानं म्हटलं आहे.

# बारामतीत अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय

**पुणे, प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता बारामती येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन होणार असल्यामुळे नागरिकांना प्रत्येक कामासाठी पुण्यात येण्याची गरज राहणार नाहीये. या निर्णयामुळे प्रशासकीय कामकाजात गती येणार असून स्थानिक पातळीवरच अनेक प्रश्न सुटणार आहेत.

जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असल्याने तसेच लोकसंख्या वाढल्याने महसूल आणि जमीनविषयक प्रकरणांचा मोठा ताण प्रशासनावर पडत होता. ग्रामीण भागातील नागरिकांना लांबचा प्रवास करून जिल्हाधिकारी कार्यालयात जावे लागत होते. ही अडचण लक्षात घेऊन राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी ११ अप्पर जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याची शिफारस एका समितीने केली होती. त्या शिफारशीला सरकारने मान्यता दिली असून त्याअंतर्गत बारामती येथे नवीन पदास हिरवा कंदील मिळाला आहे.

या कार्यालयामुळे पुनर्वसन शाखा, कुळ कायदा, महसूल विषयक प्रकरणे आणि अपील शाखेचे काम स्थानिक पातळीवर हाताळले जाणार आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाविरोधात अपील करण्यासाठी नागरिकांना आता दूर जाण्याची गरज भासणार नाही. सुनावणी प्रक्रिया अधिक जलद होईल आणि अंतिम निर्णय देण्याची कार्यपद्धती अधिक सुसूत्र बनेल.

पूर्वी पुणे जिल्ह्यात २ ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव होता. त्यामध्ये बारामती आणि आंबेगाव यांचा समावेश करण्यात आला होता. मात्र सरकारने सध्या केवळ बारामती येथेच कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आंबेगाव येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय देण्याऐवजी चाकण येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या भागात औद्योगिक व लोकसंख्येची वाढ मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

अक्रॉस मबई यह सप्ताहिक स्वामी संजय तेजसिग खिमेसरा के लिए मुद्रक, प्रकाशक- संजय मगेश भैरे द्वारा सोमानी प्रिटिंग प्रेस, गाला न. ४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेंट, सोनावाला क्रॉस रोड-२, नियर जवाहर नगर, फाटक ब्रीज, गोरेगांव पर्व), मबई- ४०००६३ से मडित और राजेंद्र पार्क, बिल्डिग न. २/२०, चोथा माला, स्टेशन रोड, गोरेगाव (प.) मबई-४००१०४ वहा प्रकाशित किया। संपादक संजय मगेश भैरे फोन: ०२२-४९७१९९३२ ईमेल: sanjay.bhaire@gmail.com RNI NO: MAHBIL/2016/68485